## नवखारमध्ये गुटखा जप्त

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील नवखारमध्ये पान मसाला गुटखा जप्त करण्यात आला आहे. रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने गुटख्यासह सहा लाख ८० हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला असून गुटख्याची तस्करी करणाऱ्याला ताब्यात घेण्यात आले आहे.पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलीस हवालदार ईश्वर लांबोटे, पोलीस हवालदार प्रतीक सावंत आदी पथकाने सापळा रचून कारवाई केली.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹



**त्वरीत जमीन विकणे आहे**

माणगाव-खांदाड येथील एकूण ३५ गुंठे जमीन विकणे आहे. माणगाव नॅशनल हायवेपासून जवळ व माणगाव बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन व मुख्य बाजारपेठ पासून फक्त ५ मिनिटाच्या अंतरावर.

संपर्क

पवार ९२७२५४१३३५ | पुराणिक ९९६०५७२७३७


# तटकरे पराभवाच्या खाईत?



- मुस्लिम नेत्यांना उतरवले मैदानात
- विसर पडलेल्या बॅ.ए.आर. अंतुलेंचा फोटो बॅनरवर झळकला

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना पराभव दिसू लागला आहे. म्हणूनच त्यांनी गुरुवारच्या प्रचारसभेतील बॅनरवर काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुलेंसह यशवंतराव चव्हाण यांचा फोटो छापल्याचे दिसून आले. तसेच, अल्पसंख्याक समाजाची नाराजी दुर करण्यासाठी त्यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांना पाचारण केल्याचेही बोलले जाते.

जिल्ह्यात युनानी सरकारी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात येत असून जून महिन्यापासून प्रवेश सुरु होत असल्याचे मुश्रीफांनी सांगितले. यावेळी मुस्लिम मतदारांना चुचकारण्यासाठी व्यासपिठावरुन विविध घोषणांचा पाऊस महायुतीच्या नेत्यांनी पाडला.

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये प्रामुख्याने इंडिया आघाडीचे शिवसेना (ठाकरेगट) अनंतगीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) सुनील तटकरे यांच्याच सरळ लढत होत आहे. दोन्ही उमेदवारांमध्ये तिसऱ्यांदा टक्कर होणार आहे. २०१४ गीते, तर २०१९ साली तटकरे विजयी झाले होते. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार यांचा गट सामील झाला. त्यामुळे राज्यातील सत्तेची समीकरणे बदलली. तटकरेंच्या हातून रायगड लोकसभा मतदारसंघ खेचण्याचा भाजपाचा यशस्वी प्रयत्न झाला.

तटकरे हे भाजपाच्या तंबूत गेल्याने मुस्लिम समाजामध्ये नाराजी पसरल्याची उघड चर्चा आहे. भाजपाची धोरणे ही अल्पसंख्याक समाजाच्या विरोधात आहेत, हे मुस्लिम समाजाला माहित आहे. सीएए, एनआरसी अशा कायद्यांमुळे भीतीचे रंग अधिक गहीरे झाले आहेत. त्यामुळे तटकरेंना मतदान न करण्याचा ट्रेंड केल्या काही दिवसांपासून समाजमाध्यमांवर सुरु आहे. श्रीवर्धन, तळा, म्हसळा, अलिबाग, पेण, रोहा तसेच गुहागर, दापोली अशा तालुक्यातील मुस्लिम समाज तटकरेंच्या विरोधात एकवटला आहे. त्यातील काहींनी उघडपणे विरोध करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांची नाराजी दूर करण्याचे तटकरे यांच्यापुढे मोठे आव्हान आहे. यासाठीच त्यांनी अल्पसंख्याक समाजाचे हसन मुश्रीफ यांना प्रचाराच्या मैदानात उतरवले असल्याची जोरदार चर्चा आहे.

दुसरीकडे काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर अंतुले यांचे बोट धरुन राजकारणात आल्याची जाहीर वाच्यता तटकरेंनी वेळोवेळी केली आहे. त्याच अंतुले यांच्या पाठीत राजकीय खंजीर तटकरेंनी खुपसला, हे देखील जगजाहीर आहे. याचा विसर रायगडच्या जनतेला विशेष करुन निष्ठावंत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना कदापी पडणार नाही. अंतुलेंचा फोटो बॅनरवर आणि डोळा मात्र, मतांवर अशी तटकरेंची केविलवाणी खेळी आहे.

जिवंतपणी अंतुलेंची कदर केली नाही, आता त्यांच्या माघारी त्यांचा फोटो वापरुन काही साध्य होणार नाही, असे जिल्ह्यातील काही निष्ठावंत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले. अंतुले हे देखील मुस्लिम समाजाचे होते. मात्र पान ५ वर

### आ.महेंद्र दळवींचा महायुतीला ठेंगा?



उमेदवारी अर्ज दाखल करण्याआधी सुनील तटकरे यांची जाहीर सभा पार पडली. त्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी एकत्रीतपणे विजयी मुद्रेसाठी दोन बोटांचे (व्हीक्ट्री) चिन्ह दाखवले, मात्र अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी अंगठा दाखवल्याचे फोटोत दिसत आहे. आधीच महायुतीमध्ये धुसपूस आहे. त्यातच दळवी यांनी अंगठा दाखवल्याने ते खरोखरच तटकरेंना निवडणुकीत अंगठा तर दाखवणार नाही ना, असा प्रश्न उपस्थितांना पडला होता.

## महायुतीच्या सभेत चोरांचा सुळसुळाट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांची गुरुवारी (दि.१८) जाहीर सभा पार पडली. या प्रसंगी चोरट्यांनी आपला हातसाफ केला. शिवसेना शिंदे गटाचे नेते अनंत गोंधळी यांची तब्बल साडेतीन तोळ्यांची सोन्याची चेन चोरट्यांनी लांबवली. त्यामुळे तटकरेंचा प्रचार करणे गोंधळी यांना आर्थिकदृष्ट्या चांगलेच नुकसानीचे ठरले आहे.

तटकरेंनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याआधी बायपास येथील डी.के.टी शाळेसमोरील मोकळ्या जागेवर जाहिर सभा पार पडली. या सभेत शिवसेना नेते अनंत गोंधळी व्यासपिठावर उपस्थित होते. सभा संपल्यानंतर सर्व नेते व्यासपिठावरुन खाली उतरत होते. तटकरे हे आपल्या निवडक नेते आणि पदाधिकाऱ्यांसह अर्ज दाखल करण्यासाठी निघून गेले.

### शिवसेना नेते अनंत गोंधळींची सोन्याची चेन चोरट्यांनी चोरली



त्यांच्या पाठोपाठ गोंधळी हे देखील खाली उतरत असताना त्यांच्या गळ्यातील चेन कोणी तरी ओढत असल्याचे जाणवले. मागे वळून पाहण्या आधीच पान ५ वर






**आजचा अग्रलेख**

**दादांची का सटकली?**

## गीतेंसाठी शरद पवार येणार मोर्ब्यात

### शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांची माहिती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघातील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मोर्बा येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार येणार आहेत. मोर्बा येथे मंगळवारी (दि.२३) सायंकाळी ४ वाजता एस.एस.हायस्कूल येथील मैदानावर जाहीर प्रचार सभा होणार असल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणिस आ.जयंत पाटील यांनी दिली.

माणगाव तालुक्यातील मोर्बा एस.एस. हायस्कूल येथे शेतकरी कामगार पक्षाच्या व इंडिया आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बुधवारी (दि.१७) सायंकाळी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी आ. जयंत पाटील बोलत होते.



यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, तालुका चिटणीस रमेश मोरे, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, माणगाव तालुकाप्रमुख गजानन अधिकारी, तळा तालुका शेकाप चिटणीस ज्ञानेश्वर भोईर, माणगाव तालुका सहचिटणीस राजेश कासारे, देगाव उपसरपंच दिनेश गुगळे, ज्येष्ठ नेते हसनमिया बंदरकर, मोर्बा माजी उपसरपंच अमोल मोहिते, अँड. कौस्तुभ धामणकर, मधुकर अर्बन, राजू मुंढे, इम्रान बंदरकर, शकील राऊत, आरिफभाई, चंद्रकांत सत्वे, अजीम बंदरकर, राजू मुल्ला, अय्याज मुल्ला आदींसह इंडिया आघाडीचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत मार्गदर्शन करताना आ. जयंत पाटील म्हणाले कि, येत्या ७ मे रोजी रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणूक होत असून ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. देशभरात व राज्यात इंडिया आघाडीसाठी उत्स्फूर्त असे वातावरण असून ज्येष्ठ नेते शरद पवार व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रचारसभांना मुस्लिम समाजबरोबरच इतर सर्व समाजांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. इंडिया आघाडीत सहभागी असलेला काँग्रेस पक्ष व इतर पान ५ वर

## निवडणूक निरीक्षक (पोलीस) मतदार संघात दाखल



**रायगड :** भारत निवडणूक आयोगाने ३२ रायगड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक (पोलीस) म्हणून जोयस लालरेम्मवी यांची नियुक्ती केली आहे. लालरेम्मवी जिल्ह्यात दाखल झाल्या असून जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी त्यांचे स्वागत केले.

### चौथ्या दिवशी पाच उमेदवारांचे अर्ज

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी रायगड लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या गुरुवारी चौथ्या दिवशी पाच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मतदारसंघात आज अखेर एकूण ११ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

मतदानाच्या तिसऱ्या टप्प्यात रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. प्रकाश बाळकृष्ण चव्हाण,१ अर्ज (भारतीय जवान किसान पार्टी), पांडुरंग दामोदर चौले १ अर्ज (अपक्ष) सुनील दत्तात्रेय तटकरे ४ अर्ज, (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), अनिकेत सुनील तटकरे,१ अर्ज ( नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी) गोपाळ यशवंतराव तंतरपाळे यांनी ३ अर्ज दाखल केले आहेत. पैकी दोन अर्ज अपक्ष, तर एक अर्ज इंडियन नॅशनल काँग्रेसमधून भरला आहे.

**वे|ध|क**

### शोमा सेन यांची ६ वर्षांनी सुटका

**नवी दिल्ली :** भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी शोमा सेन यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर बुधवारी त्यांची भायखळा येथील महिला कारागृहातून ६ वर्षांनी सुटका झाली. भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणी ४ एप्रिलला सर्वोच्च न्यायालयाने आरोपी शोमा सेन यांचा जामीन मंजूर केला होता. प्रा.सेन यांच्यावर युएपीए कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला होता.एनआयएने पुरव्या अभावी कारवाई केल्याचा आरोप जामीन अर्जात करत जामीन मंजूर व्हावा, अशी मागणी करणारी याचिका त्यांनी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. २०१८ पासून शोमा सेन या मुंबईच्या भायखळा येथील महिला तुरुंगात न्यायालयातील कोठडीत आहेत. या प्रकरणातील इतर आरोपींपैकी वकील सुधा भारद्वाज, कवी-लेखक पी. वरावरा राव, नागरी हक्क कार्यकर्ते डॉ आनंद तेलतुंबडे, कामगार कार्यकर्ते वर्नन गोन्साल्विस, वकील अरुण फरेरा यांचा समावेश आहे. फरेरा यांना जामीन मिळाल होता.

## पेणमध्ये जलजीवनचे तीनतेरा

**। पेण । प्रतिनिधी ।**



मागच्याच महिन्यात पेण पंचायत समिती प्रशासनाकडून २ कोटी १४ लाख ५० हजार रूपयांचा पाणी टंचाई संभाव्य आराखडा तयार झाला. महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये ५४ गावे १०९ वाडयांचा समावेश आहे. त्यांना फक्त ९ टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. पेण तालुक्यात २०२१ पासून जलजीवन योजनेअतंर्गत १०६ योजनांची मंजूरी मिळाली आहे. यामध्ये आतापर्यंत फक्त ६ योजना पूर्ण झाल्या आहेत. त्या ६ योजनांमध्ये देखील अनेक त्रुटी आहेत. पेण तालुका प्रशासनाचा नाकर्तेपणा आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे पेणकरांच्या नशिबी उपेक्षाच आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उमेदवारांकडून आश्वासनांचा पाऊस पडत आहे. परंतु २०१९ ला दिलेल्या आश्वासनाचे काय? पेण तालुक्याचा विचार करता खा. सुनील तटकरे यांनी एक शब्दही पेण येथील जलजीवन योजनेवर कधी काढला नाही. तर आमदार रवि पाटील यांनी प्रत्येक भाषणांत घर-घर नल याचा ओहापोह केला. परंतु १०६ योजना पूर्ण झाल्या की नाही, याबाबत कधीच भाष्य केले नाही.

या १०६ योजनांचा विचार केल्यास जे ठेकेदार आहेत ते राजकीय पुढाऱ्यांचे बगलबच्चे आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी बोलायलाही पुढे येत नाहीत. कारण त्यांना सर्वसामान्य जनतेपेक्षा त्यांच्या ठेकेदार कार्यकर्ते जिवंत राहिले पाहिजेत. हा त्यांचा सरळ हेतू आहे, असेच म्हणावे लागेल. जलजीवन योजनेअतंर्गत हर घर पाणी हे उद्देश होते. परंतु तीन वर्ष उलटूनही १०६ योजनांपैकी ६ योजना पूर्ण व्हाव्यात, ही मोठी शोकांतिका.

या योजनेसाठी निधीची कमतरता नाही. जलजीवन योजनेसाठी एकूण ११,५१८.१७ लक्ष रूपये मंजूर असून त्यापैकी २,९२७.५६ लक्ष रूपये आतापर्यत खर्च झाला आहे. याचाच अर्थ निधी असूनही काम होत नाही. याला सर्वस्वी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी जबाबदार आहेत. तटकरेंना सर्वसामान्यांची मते हवीत. मात्र त्यांच्या समस्या सोडविण्यात त्यांना रस नाही, याचा फटका आगामी निवडणुकीत तटकरेंना बसणार, हे निश्चित.

## मोदींना सत्तेचा उन्माद- शरद पवार

**। बारामती । वृत्तसंस्था ।**

झारखंड हे आदिवासींचं राज्य आहे, तिथे आदिवासी मुख्यमंत्री आहेत. मोदींवर टीका केली म्हणून सोरेन यांना तुरुंगात टाकलं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही तुरुंगात टाकलं आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी मोदींना विरोध केला. त्यांच्या सरकारमधले तीन मंत्री तुरुंगात आहेत. सत्ता ही लोकांच्या सेवेसाठी असते, मात्र लोकशाही उद्ध्वस्त करण्याचं काम या ठिकाणी होतं आहे. सत्ताधाऱ्यांना सत्तेचा उन्माद चढला आहे. अशावेळी तुमची आणि माझी जबाबदारी आहे की मोदी आणि त्यांच्या विचारांच्या पक्षाचा आपल्याला पराभव करायचा आहे, असे आवाहन शरद पवार यांनी केले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे व पुणे लोकसभा मतदार संघाचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी गुरुवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यानंतर क्वार्टर गेट परिसरातील शांताई हॉटेलसमोर झालेल्या महाविकास आघाडीच्या सभेमध्ये तिन्ही उमेदवारांच्या प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहीर, पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे, काँग्रेसचे नेते डॉ. विश्वजीत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे, माजी खासदार अशोकराव मोहोळ, मोहन जोशी, उमेदवार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे व रवींद्र धंगेकर आदी यावेळी उपस्थित होते.

आजचा दिवस हा निवडणुकीसाठी उमेदवाराचा अर्ज भरण्याचा दिवस आहे. अर्ज भरायलाच लोक पान ५ वर

**२०१४ मध्ये मोदींनी सांगितलं होतं वर्षाला दोन कोटी तरुणांना रोजगार देणार. आज ८६ टक्के तरुण मुलं बेकार आहेत अशी स्थिती आहे. मोदींनी आश्वासन दिलेल्या अशा अनेक गोष्टी सांगता येतील ज्या पूर्ण झाल्या नाहीत असंही आपल्या भाषणात शरद पवार यांनी म्हटलं आहे. आश्वासन द्यायचं, शब्द द्यायचा आणि कृती त्याच्या विरोधात करायची ही मोदींची नीती असेल तर आपण आता त्यांच्या हाती सत्ता देता कामा नये. सत्तेचा उन्माद काय असतो तो या राज्यकर्त्यांनी दाखवला आहे, असं शरद पवार म्हणाले.**

## ‘डिपॉझिट’ जप्त शब्दाची निवडणुकीत रंगत

**सुयोग आंग्रे**

**। रायगड ।**

आमच्या विरोधात लढण्याचं धाडस करू नये, आम्ही त्याचं डिपॉझिट जप्त केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा राजकीय सभांमध्ये दिला जातो. अनेक बडे-बडे मान्यवर ईर्षेने निवडणूक लढतात, मात्र जनमत त्यांच्या विरोधी असते आणि त्यांना अनामत रक्कम गमवावी लागते. ही रक्कम किती असते, ती कोणत्या परिस्थितीत जप्त केली जाते, पराभव झाला तरी ती परत केली जाते का, याविषयी निवडणूक आयोगाचे स्पष्ट नियम आहेत.

कुणीही उठावं, निवडणुकीचा अर्ज भरावा, लढावं, असं व्हायला नको म्हणून अनामत रक्कम भरण्याची अट लागू करण्यात आली. रोख स्वरुपात ही रक्कम भरता येते. जास्तीत जास्त एक हजार रुपयांची नाणी घ्यावीत, असा नियमदेखील आहे. सन २०२४ ची लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर, काही ठिकाणी आम्ही पाचशे लोक मैदानात उतरवणार आहोत. त्यामुळे निवडणूक बॅलेट पेपरवर घ्यावी लागेल, असेही सांगितले जात आहे.

आता एवढ्या सगळ्या लोकांनी प्रत्येकी २५ हजार रुपये किंवा १० हजार रुपये भरायचे, म्हणजे खायची गोष्ट आहे का? अनुक्रमे सव्वा कोटी आणि ५० लाख एवढी ही रक्कम होते. शिवाय, अपवाद वगळता ती जप्त होण्याची शक्यता अधिक. पान ५ वर

**लोकसभा निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारास डिपॉझिट म्हणून २५ हजार रुपयांची रक्कम भरावी लागते. मागास प्रवर्गातील उमेदवार असेल तर त्याला १२ हजार ५०० रुपये डिपॉझिट भरावे लागते. विधानसभा निवडणुकीला या रकमेच्या निम्मी म्हणजे अनुक्रमे १२ हजार ५०० आणि सहा हजार रुपये एवढी डिपॉझिट रक्कम भरावी लागते. आरक्षित प्रवर्गातील व्यक्ती खुल्या जागेवर निवडणूक लढणार असेल तरी तिला सवलत लागू असते.**

**तरच परत मिळते डिपॉझिट**

- उमेदवारी अर्ज छाननीत बाद ठरवला गेला तर...
- उमेदवाराने उमेदवारी अर्ज वेळेत माघार घेतला तर...
- मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू झाला तर...
- उमेदवाराचा विजय झाला तर...
- पराभव झाला तरी १/६ एवढ्या प्रमाणात मते घेतली तर.



### असे होते डिपॉझिट जप्त

निवडणुकीत सर्व उमेदवारांना मिळालेल्या एकूण झालेल्या मतांच्या एक षष्ठांश मतांपेक्षा (झालेल्या मतदानाचा सहावा भाग) एक मत अधिक मिळाले तरी उमेदवाराला डिपॉझिट परत केले जाते. बरोबर एक षष्ठांश मते मिळाली तरी डिपॉझिट जप्त केले जाते.

### जागतिक वारसा दिनानिमित्त पुरातत्व विभागाचा उपक्रम

## जंजिरा किल्ल्यात विनामुल्य प्रवेश

**। कोर्लई । वार्ताहर ।**

जागतिक वारसा दिवसानिमित्ताने जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना पुरातत्व विभागातर्फे प्रवेश मोफत देण्यात आला. पर्यटक वाढीसाठी व पर्यटकांना गड, दुर्ग किल्ल्यांची ओळख व्हावी, यासाठी पुरातत्व विभागातर्फे हा दिवस साजरा करण्यात येतो.

पृथ्वीवरील सांस्कृतिक वारसा आणि विविधता यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १८ एप्रिल या दिवशी, ‘वर्ल्ड हेरिटेज डे’ म्हणजेच जागतिक वारसा दिवस साजरा केला जातो. हा दिवस सर्वप्रथम संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था अथवा युनेस्कोद्वारे साजरा केला होता. लोकांना तसेच स्थानिक नागरिकांना त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे, विविध स्मारकांच्या जतनाचे महत्त्व समजण्यासाठी आणि ते जपण्यास प्रेरणा देणे, असा या दिवसाचा हेतू आहे.



१९८३ सालापासून स्मारके आणि साइट्सवरील आंतरराष्ट्रीय परिषदेने थीम ठेवण्यास सुरुवात केली. त्या थीमनुसार हा दिवस साजरा केला जातो. यंदा वर्ष २०२४ ची थीम ही व्हेनिस चार्टरच्या दृष्टीतून आपत्ती आणि संघर्ष अशी ठेवण्यात आली आहे.

ऐतिहासिक नबाबकालिन प्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी देश-विदेशातून लाखो पर्यटक येत असतात. हे किल्ले पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या प्रकारे ओळख व्हावी व त्याचे महत्त्व समजावे म्हणून जागतिक वारसा दिवस साजरा करण्यात येत असतो.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)





# लालपरीवर महायुतीच्या जाहिराती

## प्रकाश आंबेडकरांची निवडणूक आयोगात तक्रार

**। वाशिम । प्रतिनिधी ।**

राज्य परिवहन मंडळाच्या बसवरुन महायुतीचा प्रचार होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते अकोला लोकसभेचे उमेदवार प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट शेअर करत त्यांनी निवडणूक विभागाला टॅग करून प्रश्न विचारला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर हा प्रचारासाठी कसा केला जाऊ शकतो असा प्रश्न त्यांनी एक्सवर फोटो शेअर करत उपस्थित केला आहे.

वाशिम आगाराच्या बस क्र. एम. एच. ४० वाय. ५३४७ वर महायुतीचा प्रचार करणारे पोस्टर लावलेले असून त्या संदर्भात त्यांनी ही एक्स पोस्ट केली आहे.

देशात लोकसभा निवडणूक सुरू असून सर्वच पक्षाकडून जोरात प्रचार सुरू आहे. मात्र, भाजप, शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी अजित पवार गट आणि मित्र पक्षाच्या प्रचार पोस्टर चक्क एसटी महामंडळाच्या बसेसवर लावण्यात आले आहेत.

या बॅनरवर महायुती निशाणी धनुष्यबाण असे लिहलेले असून धनुष्यबाण आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मोठा फोटो सोबतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस, अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे फोटो छापलेले आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर पोस्ट करुन सार्वजनिक मालकीच्या वाहतुकीवर याची परवानगी कशी आहे? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

दरम्यान, निवडणुकीची रणधुमाळी असताना आचारसंहिता आहे. आचारसंहितेच्या काळात कुठेही अशाप्रकारे बॅनर, फोटो वापरता येत नाहीत. अशा काळात सरकारी एसटी बसवर महायुतीचा बॅनर कसा काय दिसतोय असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी निवडणूक विभागाला केला आहे.




# ‘नटसम्राट, कार्यसम्राट परवडतो पण खोकेसम्राट परवडत नाही’

**। पुणे । प्रतिनिधी ।**



पुण्यात महाविकास आघाडीची सभा गुरुवारी (दि. १८) पार पडली. या सभेत खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. नटसम्राट परवडतो, कार्यसम्राट परवडतो. पण धोके सम्राट, खोके सम्राट, पलटुसम्राट परवडत नाही, असा हल्लाबोल त्यांनी केला.

पुण्यात महाविकास आघाडीची सभा पार पडली बारामतीच्या ममहाविकास आघाडीच्या उमेदवार खा. सुप्रिया सुळे, पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे प्रचारासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले.

या सभेत डॉ. अमोल कोल्हे यांनी जोरदार हल्लाबोल केला. आता पराभव समोर दिसू लागल्याने महायुतीकडून देशाच्या धोरणांविषयी बोलले जात नाही. वैयक्तिक टीका केली जाते.

परवा कुणीतरी विचारले नटसम्राट पाहिजे की कार्यसम्राट पाहिजे. मी त्यांना सांगितले की, नटसम्राट परवडतो, कार्यसम्राट परवडतो. पण धोके सम्राट, खोके सम्राट, पलटुसम्राट परवडत नाही, अशी टीका त्यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवारांवर केली आहे.

---

वे|ध|क

### अभिजित बिचुकले लोकसभेच्या रिंगणात

**सातारा** : साताऱ्याची जागा कुणाकडे जाणार यावर राजकीय वर्तुळात चर्चा होती. भाजपाने उदयनराजे यांना उमेदवारी घोषित करून या चर्चांना पूर्णविराम दिला. साताऱ्यात महायुतीकडून उदयनराजे आणि महाविकास आघाडीकडून शशिकांत शिंदे यांच्यात लढत होणार आहे. यातच आता बिग बॉस फेम अभिजित बिचुकले यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असून, साताऱ्यातून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती दिली. २००४, २००९, २०१४, २०१९ या चार निवडणुका लढवल्या आहेत. साताऱ्याच्या जनतेने २००९ मध्ये मला १२ हजारांहून जास्त मतदान केले होते. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान टिकवायचे आहे.

### महिला उमेदवाराकडे कुबेराचा खजिना

**मुंबई** : भाजपने दक्षिण गोवा लोकसभा निवडणुकीत उद्योगपती श्रीनिवास डेम्पो यांची पत्नी पल्लवी डेम्पो यांना मैदानात उतरवले आहे. पल्लवी यांनी मंगळवारी त्यांचा उमदेवारी अर्ज दाकल केला. निवडणूक अधिकाऱ्याकडे त्यांनी ११९ पानी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. या शपथपत्रानुसार, पती श्रीनिवास डेम्पो यांच्यासह त्यांची एकूण संपत्ती १,४०० कोटी रुपये आहे. डेम्पो समूहाचा व्यवसाय फुटबॉल लीगच्या फ्रंचाईजीपासून ते रिअल इस्टेट, जहाज निर्मिती, शिक्षण, खाण, खनिजकर्म उद्योगापर्यंत पसरलेला आहे.

### स्टार प्रचारकांच्या सभेची प्रतीक्षाच

**यवतमाळ** : यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघात प्रचार संपण्यास केवळ आठ दिवसांचा अवधी शिल्लक आहे. उमेदवारांनी अर्ज दाखल करून १५ दिवस होत आले. मात्र निवडणूक प्रचाराने अद्यापही वेग घेतला नाही. महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये येथे थेट लढत होत असली तरी या दोन्ही उमेदवारांना स्टार प्रचारकाच्या सभेची प्रतीक्षा करावी लागत आहे.

# सुप्रिया सुळेंचा उमेदवारी अर्ज दाखल

**। पुणे । प्रतिनिधी ।**



बारामतीच्या विद्यमान खा. सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी (दि.१८) निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरला. पुणे जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघांपैकी बारामती लोकसभा मतदारसंघ राज्यातील दुसऱ्या टप्प्यात असल्याने तेथे १२ एप्रिलपासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. या मतदारसंघात अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत शुक्रवारी (दि. १९) आहे.

उर्वरित पुणे, मावळ व शिरूर या तीन मतदारसंघांसाठीची अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू होत आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल असून, अर्जांची छाननी दुसऱ्या दिवशी अर्थात २६ एप्रिलला होणार आहे. अर्ज माघारीची दि.२९ एप्रिल आहे. यावेळी त्यांच्यासोबत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विश्वजित कदम, शिरूरचे खा. डॉ. अमोल कोल्हे, युगेंद्र पवार उपस्थित होते. बारामती लोकसभा निवडणुकीत सुळे यांची उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांशी लढत होणार आहे.

### नगरसेवकांचा शाहूंना पाठिंबा

**कोल्हापूर** : महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्यासोबत राहण्याचा निर्धार केला. यावेळी आ. सतेज पाटील आ. पी. एन. पाटील, आ. जयश्री जाधव, आ. ऋतुराज पाटील, आ. जयंत आसगावकर, माजी आ. मालोजीराजे छत्रपती, काँग्रेसचे प्रदेश निरीक्षक रामचंद्र वळवी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी साऱ्यांनी एकत्र येऊन काम करण्याची वेळ आली आहे. कोणत्या कामांना प्राधान्य द्यावे, हे ठरवायला हवे. एकत्रित ताकद निर्माण झाली तर राहून गेलेली कामे पूर्ण करून सुधारणा घडवता येईल, असे सांगितले.



# सुनेत्रा पवार यांचा अर्ज दाखल

**। बारामती । प्रतिनिधी ।**

बारामती लोकसभा म तदारसंघातून महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज गुरुवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सुनिता पवार यांची पती उपमुख्यमंत्री अजित पवार आदी यावेळी उपस्थित होते.

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत शुक्रवारी (दि. १९) असून अर्ज दाखल करण्याच्या आदल्या दिवशी महायुतीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सुनेत्रा पवार यांनी आपला अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, चंद्रकांत पाटील, नीलम गोऱ्हे, रामदास आठवले, हर्षवर्धन पाटील, प्रफुल्ल पटेल, आ. राहुल कुल, भगवान तापकीर, माजी आ. विजय शिवतारे, खा. मेधा कुलकर्णी तसेच सुनेत्रा पवार यांचे दोन्ही पुत्र पार्थ व जय पवार यावेळी उपस्थित होते.

### डॉ. चेतन नरके यांची माघार

**कोल्हापूर** : ‘विझलो जरी मी आज, हा माझा अंत नाही, पेटेन उद्या नव्याने!’ अशा काव्यपंक्ती उधृत्त करीत गोकुळ दूध संघाचे संचालक, थायलंडचे आर्थिक सल्लागार डॉ. चेतन नरके यांनी बुधवारी कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून माघार घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे घोषित केले. निवडणुकीसाठी पाठिंबा कोणाला याचा निर्णय लवकरच जाहीर करणार असल्याचे सांगत नरके यांनी आपले पत्ते राखून ठेवले आहेत. काही अपरिहार्य राजकीय आणि सामाजिक कारणामुळे लोकसभा निवडणुकीतून माघार घेत आहे. मात्र, निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाला अथवा उमेदवाराला पाठींबा देणार नसल्याची घोषणा त्यांनी केली.

# जागा वाटपावर दिल्लीतील नेते नाराज

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



महायुतीमध्ये जागावाटपावरून अंतिम निर्णय झालेला नाही. काही जागांवरून महायुतीत एकमत होत नसल्यामुळे राज्यातील काही जागांचा तिढा कायम आहे. मात्र, महायुतीतील शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि भाजपा या पक्षातील नेत्यांनी जागांवरुन केलेल्या दाव्यामुळे दिल्लीतील भाजपाचे पक्षश्रेष्ठी, नाराज असल्याचे बोलले जात आहे. महायुतीत चार ते पाच जागांचा अद्याप तिढा कायम आहे. या जागांवर महायुतीतील नेत्यांमध्ये एकमत होत नाही. त्यामुळे या जागांवर महायुतीत तिन्ही पक्षांकडून दावा करण्यात येत आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेत्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच या ठिकाणी आपल्या पक्षाचा दावाही करण्यात येत आहे. नाशिक, ठाणे या जागा शिवसेनेच्या वाट्याच्या आहेत. मात्र, नाशिक जागेवर राष्ट्रवादीने दावा केला असून, येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळावी असा आग्रह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आहे. तसेच दक्षिण मुंबईतून योग्य उमेदवार मिळत नसल्यामुळे या जागेवरील तिढा सुटत नाही आहे. येथे कुठला उमेदवार द्यावा हे महायुतीसमोर आव्हान आहे.

उमेदवारी आणि जागा वाटपावरून महायुतीतील नेत्यांची वेगवेगळी मत आणि त्यांच्या प्रतिक्रिया लोकांमध्ये जात आहेत. यामुळं लोकांमध्ये, मतदारांमध्ये एक वेगळा नकारात्मक मेसेज जाऊ शकतो. चुकीचा संदेश जाऊ शकतो. त्यामुळे भाजपाबद्दल किंबहुना महायुतीबद्दल लोकांच्या मनात गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. नेत्यांच्या वेगळ्या बोलण्यामुळे आपल्यामध्येच एकी नसल्याचा चित्र लोकांमध्ये जाऊ शकतं. त्याचा परिणाम मतदानावर पडू शकतो, असे महाशक्तीने म्हटले आहे.

### शिवेंद्रराजेंची भूमिका ठरणार महत्त्वाची

**सातारा** : सातारा लोकसभा मतदारसंघात दोन्ही उमेदवार सातारा व जावळी तालुक्यांतील आहेत. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले हे भाजपमध्ये असल्याने त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. शिवेंद्रसिंहराजे समर्थकांत उदयनराजेंबाबत काही प्रमाणात नाराजी आहे, तर जावळीचे भूमिपुत्र असल्याने शशिकांत शिंदे यांना सहानुभूती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे उदयनराजे यांना सातारा, जावळीत विशेष लक्ष द्यावे लागेल. दोन्ही राजांचे मनोमिलन कार्यकर्त्यांपर्यंत आणि मतदारांपर्यंत पाझरणार का, यावर सर्व काही अवलंबून आहे.

# शिंदेच्या हातून दुसरा मतदार संघही गेला

## ■ रत्नागिरी-सिंधुदुर्गात भाजपाच्या राणेंना उमेदवारी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

महायुतीमधील शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यात सात ते आठ जागांवर वाद आहे. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याचा १९ एप्रिल शेवटचा दिवस होता. त्यापूर्वी रत्नागिरी-सिंधुदुर्ग जागेवरील भाजप-शिवसेनेतील वाद मिटला आहे. या ठिकाणी शिवसेनेकडून एक पाऊल मागे घेण्यात आले आहे. महायुतीचे उमेदवार म्हणून नारायण राणे यांच्या नावाची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी केली. त्यांचे बंधू किरण सामंत यांनी माघार घेतली.

यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या हातून दुसरा मतदार संघ गेला आहे. यापूर्वी अमरावतीची शिवसेनेची असलेल्या जागेवरही भाजपकडून नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.

किरण सामंत यांनी निवडणूक रिंगणातून माघार घेण्याचा निर्णय जाहीर करताना उदय सामंत यांनी भविष्यात किरण सामंत खासदार होणार असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, आम्ही काही काळ थांबणार आहोत.

भविष्यात किरण सामंतच खासदार असणार आहेत. आता आम्ही सर्व नारायण राणे यांच्या पाठिशी आहोत. महायुतीमध्ये तेढ निर्माण होऊ नये, यासाठी आम्ही माघार घेतली आहे. शिवसेनेसाठी कोकण महत्वाचा होता. यामुळे कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्ग जागेचा आग्रह उदय सामंत यांनी लावून धरला होता. त्या ठिकाणी त्यांचे बंधू किरण सामंत यांनी निवडणूक लढण्याची पूर्ण तयारी केली होती.

दुसरीकडे नारायण राणे यांनीही प्रचार सुरु केला होता. नाव जाहीर नसताना केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी प्रचाराचा धडाका लावला होता. यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या हातून दुसरा मतदार संघ गेला आहे.

# मतदानाकरिता १२ पुरावे ग्राह्य

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर १२ पुराव्या पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहेत.


स्वत:ची ओळख पटवण्यासाठी पुराव्यांमध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना,पॅन कार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारे नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रांसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे १२ कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

### सर्वांनाच पाहिजे नाशिकची जागा

**नाशिक** : महायुतीमधील सर्वच घटक पक्षांना नाशिकची जागा हवी आहे, त्यात गैर नाही. मात्र, महायुती म्हणून जो उमेदवार दिला जाईल, त्यासाठी महायुतीचे सर्व घटक पक्ष एकदिलाने काम करतील, असा दावा भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला. शेवटच्या टप्प्यात नाशिकची निवडणूक असल्याने जागानिश्चितीसंदर्भात विलंब होत असल्याची सारवासारव त्यांनी केली.

# भुजबळांचा महायुतीला अल्टिमेटम

**। नाशिक । प्रतिनिधी ।**



नाशिकसह अन्य काही जागांवर महायुतीचे घोडे अडलेले दिसत आहे. नाशिकच्या जागेसाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. नाशिकच्या जागेसाठी हेमंत गोडसे आग्रही असून, अजित पवार गटाकडून छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत आहे. महाराष्ट्रात व नाशिकमध्ये अजून नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या सभा होणार आहेत, असे भुजबळ सांगितले. नाशिकच्या जागेवरून म हायुतीत तिढा असल्याचे पाहायला मिळत आहे. यावर भाष्य करताना भुजबळ यांनी थेट महायुतीला अल्टिमेटम दिल्याचे सांगितले जात आहे. नाशिकसाठी ज्यांना उमेदवारी द्यायची असेल त्यांना द्या, पण २० मे च्या आधी निर्णय घ्या. कारण, २० मे चा मुहुर्त आहे, त्यामुळे त्या आधी निर्णय झाला तर बरे होईल. तसेच कुठल्याही पक्षाला नाशिकची जागा सोडा, पण २० मे च्या आधी सोडा, असे स्पष्ट मत छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. दरम्यान, नाशिकच्या काळाराम मंदिरात नाशिकसाठी इच्छुक आणि चर्चेत असलेले हेमंत गोडसे आणि छगन भुजबळ यांची भेट झाली. हेमंत गोडसे माझे मित्र आहेत. अनेकवेळा येथील मंदिरात आलो आहे. रामनवमीनिमित्त दर्शन घेण्यासाठी आलो असता, ते पण मंदिरात आले होते. त्यावेळी, त्यांना शुभेच्छा दिल्या, असे भुजबळ यांनी सांगितले.

### पुण्यात प्रचाराची रणधुमाळी

**पुणे** : महाविकास आघाडीच्या उमेदवार खा. सुप्रिया सुळे, पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे, याच्या प्रचार सभा होणार असून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी करण्यात आली आहे. शरद पवार, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, माजी बाळासाहेब थोरात, संजय राऊत, संपर्क प्रमुख सचिन आहिर उपस्थितीत महाविकास आघाडीची सभा होणार आहे.

# पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी पोलिंग पार्टी रवाना

## प्रशासनाची तयारी पूर्ण; नागपूर, रामटेकमध्ये १२४ संवेदनशील मतदान केंद्रे

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची तयारी ही अंतिम टप्प्यात आलेली आहे. आज लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी पोलिंग पार्टी रवाना झालेल्या आहेत. पहिल्या टप्प्यात विदर्भातील एकूण पाच मतदारसंघाचा समावेश आहे. नागपूर आणि रामटेक मतदारसंघात एकूण ४२ लाख ७२ हजार ३६६ मतदार असून त्याकरिता रामटेकमध्ये २४०५ तर नागपूरमध्ये २१०५ मतदान केंद्र निर्माण करण्यात आलीत. सकाळपासून पोलिंग पार्टीला मतदानाचं साहित्य वाटप सुरू झालं असून पोलिंग पार्टी आता रवाना झालेल्या आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून नागपूर आणि रामटेक मतदारसंघात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. संवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष दिले जात आहे.




नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिलला मतदान होत आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी सुमारे ५४ टक्के मतदान झाले होते. यंदा ही टक्केवारी ७५ टक्क्यांवर घेऊन जाण्याचं उद्धिष्ट ठेवण्यात आले आहे. नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघ मिळून १२४ संवेदनशील मतदान केंद्रे आहेत. यात रामटेकमध्ये ६३ तर नागपूरमध्ये ६१ केंद्रे आहेत. यात काटोल १५, सावनेर ११, हिंगणा ७, उमरेड १३, कामठी ७ तर राम टेकमध्ये १० संवेदशील मतदान केंद्रे आहेत. तर नागपूर लोकसभेंतर्गत नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघ ११, नागपूर दक्षिण ११, नागपूर पूर्व १०, नागपूर मध्य ८, नागपूर पश्चिम ९, नागपूर उत्तर १२ अशा एकूण ६१ मतदान केंद्रांचा समावेश आहे. या या केंद्रांवर विशेष लक्ष राहणार असून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात राहणार आहे. यातील सुमारे ५० टक्के मतदान केंद्राचं वेबकास्टिंग होणार आहे.

जिल्ह्यात एकूण ४५१० मतदान केंद्रे आहेत. यात रामटेकमध्ये २४०५ तर नागपूरमध्ये २१०५ मतदान केंद्रे आहेत. यात सहाय्यकारी मतदान केंद्रांचाही समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. या ठिकाणी क्षेत्रीय अधिकारी, मतदान पथकांची नियुक्ती करण्यात आली असून ही पथकं आज मतदानस्थळी रवाना होणार आहेत. मतदान पथकांसोबत प्राथमिक वैद्यकीय किट, ग्लुकोज असणार आहे. आशा सेविका, अंगणवाडी सेविकांची यासाठी मदत घेतली जाणार आहे.

# अजितदादांनी भरला डमी अर्ज

**। पुणे । प्रतिनिधी ।**



पवार कुटुंबातच नणंद-भावजय यांच्यात लढत पाहायला मिळणार असून या निमित्ताने भावकीचा वादही सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच अजित पवार यांनी बारामतीसाठी डमी अर्ज भरला आहे. सुनेत्रा पवारांनी उमेदवारीचा अर्ज दाखल करताच अजितदादांनी भरला. बारामती लोकसभा मतदारसंघ लोकसभा निवडणुका घोषित झाल्यापासून चर्चेत आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. तर शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे यांना लोकसभेचे तिकीट देण्यात आले आहे.

अजित पवार यांच्याकडून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यासाठी जोरदार प्रचार सुरू आहे. तर शरद पवार यांच्याकडून त्यांची मुलगी सुप्रिया सुळे यांचा जंगी प्रचार सुरू आहे. अशाचत सुनेत्रा पवारांनी उमेदावारीचा अर्ज दाखल केल्यानंतर अजित पवार यांनी बारामतीसाठी डमी अर्ज भरला आहे. तर खबरदारी म्हणून अजित पवारांनी डमी उमेदवारी अर्ज भरला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विजय शिवतारे यांच्या उपस्थितीत दादांनी हा डमी अर्ज भरला आहे.

वे|ध|क

# तटकरेंच्या उमेदवारीला ‘मनसे’ विरोध

## वैभव खेडेकरांनी काम न करण्याचे केले जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज ठाकरे यांनी मनसेच्या गुढी पाडवा मेळाव्यात महायुतीला पाठिंबा देणार असल्याचं जाहीर केलं. मात्र, त्यांच्या या निर्णयाने मनसैनिक नाराज



असल्याचं चित्र आहे. मनसेचे सरचिटणीस वैभव खेडेकर यांनी उमेदवार सुनील तटकरे यांना विरोध केला आहे.

राज्यातली पहिली मनसेची खेड नगरपरिषद निवडून आणणारा कोकणातला शिलेदार वैभव खेडेकर राज ठाकरे यांनी महायुतीला दिलेल्या पाठिंब्यानंतर नाराज झाला आहे. यासाठी ते राज ठाकरेंची पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन व्यथा मांडणार आहेत. ज्या लोकांनी कोकणात मनसे संपवण्याचे काम केले, आम्हाला खोट्या गुन्ह्यात अडकवून अटक केली, मनसेने निवडून आणलेल्या ग्रामपंचायती फोडल्या, अशा लोकांसोबत काम कसं करायचं, असा खडा सवालच मनसेचे राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर यांनी केला आहे. यावेळी त्यांनी शिवसेनेचे कदम यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली.

राज ठाकरे यांचा आदेश आम्हाला मान्य, पण खासदार पदाचे उमेदवार सुनील तटकरे यांनी खेडच्या विकासकामांसाठी काहीच प्रयत्न केले नाहीत, हे सत्य आहे, अशी प्रतिक्रिया वैभव खेडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. राज ठाकरे यांची भेट होणार असून या भेटीनंतर वैभव खेडेकर कोणती भूमिका मांडतात, याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिला आहे. राज ठाकरे यांच्या आदेशानंतर कोकणातील मनसैनिक नाराज असून राज ठाकरे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन वस्तुस्थिती पटवून देऊ, असा विश्वास खेडेकर यांनी व्यक्त केला आहे. मनसेच्या प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. कोकणातील पदाधिकाऱ्यांमध्ये असलेली नाराजी राज ठाकरे कशी दूर करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.वैभव खेडेकर यांना शिवतीर्थावर चर्चेसाठी बोलवण्यात आलं आहे. तसेच राज ठाकरे उद्या उत्तर रत्नागिरी आणि दक्षिण रायगड मतदार संघातील मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून रायगड लोकसभा मतदारसंघावरून मनसेचे खेडेकर नाराज होते. ज्यांनी मनसे संपवण्याचे काम केलं, त्यांचं आम्ही काम करायचं का असा सवाल त्यांनी मनसैनिकांनी उपस्थित केला होता.

# ‘मतदान करू या’ पथनाट्याचे सादरीकरण



**उरण :** उरण कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मधुबन कट्ट्यावर आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमात बुधवारी (दि.१७) किशोर पाटील लिखित,दिग्दर्शित ‘मतदान करू या’ पथनाट्याचे उरण शेवा केंद्राच्या शिक्षकवृदांनी अफलातून सादरीकरण केले. प्रा एल बी पाटील यांनी उरण येथे नागरिकांना नाटकाची पार्श्वभूमी सांगितली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक अशोक म्हात्रे होते.

यावेळी चंद्रकांत मुकादम, प्रकाश पाटील, देवदत्त सूर्यवंशी, एन. एम. पाटील, नारायण भोईर, मिरा ब्रीद यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नृत्यदिग्दर्शक अमृत म्हात्रे, जलतरणपटू सारा पाटील, जयदास पाटील यांना जीवनगौरव पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. ‘मतदान करू या’ पथनाट्याचे कलाकार, किशोर पाटील,महेंद्र गावंड, विश्वनाथ पाटील, नरेश म्हात्रे, संजय होळकर, शिवप्रसाद पंडित, संगिता मेहेत्रे, शर्मिला गावंड, प्रमिला गावंड, रुपाली म्हात्रे, हार्मोनियम रमण पंडित, ढोलकी देविदास पाटील, सूत्र संचालन म. का. म्हात्रे या साऱ्या कलाकारांनी उत्तम असे नाट्य सादरीकरण करुन मतदान करण्यासाठी जनजागृती केली. तसेच उपस्थितांनी या नाट्याचे, कलाकारांचे कौतुक केले. सरकारने हे सादरीकरण राज्यभर करून मतदानाचा खरा जागर जनतेत घडवावा, अशा प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी दिल्या. कविसंमेलनात संजय होळकर, अनुप शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे, भरत पाटील, अशोक म्हात्रे, हेमंत पाटील, रामचंद्र म्हात्रे यांनी कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले.




# ‘धैर्य’ कोमजले

**। रायगड । खास प्रतिनिधी । लोकसभा मतदार संघातून तिकीट मिळवण्यासाठी भाजपाचे धैर्यशिल पाटील यांनी जंगजंग पछाडले होते मात्र, तटकरेंच्या राजकीय खेळीमुळे त्यांच्या पदरात काहीच पडले नाही. उलट भाजपासह त्यांना आता तटकरेंच्या प्रचारासाठी मैदानात उतरावे लागले आहे. तटकरेंचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांसह पाटील हे जातीने हजर होते. तटकरेंनी भाजपासह धैर्यशिल पाटील यांचा चांगलाच गेम केल्याचे त्या निमीत्ताने अधोरेखित होते.**

गेल्या एक-दीड वर्षापासून धैर्यशिल पाटील व त्यांचे समर्थक हे रायगड लोकसभेच्या निवडणूकीकडे डोळे लावून बसले होते. रायगडमधून आपल्यालाच उमेदवारी मिळणार, अशा वल्गना भाजपाच्या नेत्यांसह धैर्यशिल पाटील यांनी केल्या होत्या. सदरची जागा मिळावी, यासाठी त्यांनी महायुतीत दबावतंत्राचा वापर सुर केला होता. धैर्यशिल पाटील यांना भाजपामध्ये आणणाऱ्यांनी पाटील यांच्यामध्ये हवा भरुन तुम्हीच खासदार होणार अशी न पूर्ण होणारी स्वप्न दाखवली. अखेरे भाजपासह पाटील यांच्या भ्रमाचा भोपळा तटकरेंच्या जाहिर झालेल्या उमेदवारीने फुटला. तटकरेंनी भाजपाच्या वरिष्ठांना हाताशी घेत आपल्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले.

त्यानंतर पाटील हे काही कालावधीसाठी गायब झाल्याची चर्चा होती. अखेर वरिष्ठांच्या मनधरणीनंतर पाटील यांना महायुतीचे तटकरे यांच्या प्रचारासाठी बाहेर पडावे लागले आहे. गुरुवारी (दि.१८) झालेलया जाहिर प्रचार सभेत भाजपाचे मंत्री रविंद्र चव्हाण, पेणचे आ. रविंद्र पाटील, स्वतः धैर्यशिल पाटील यांच्यावर तटकरेंसाठी मते मागण्याची नामुष्की ओढवल्याचे दिसून आले.

काहीच दिवसांपूर्वी तटकरेंना आव्हान उभे करणाऱ्यांनी आपापली तलवार म्यान केल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या नेत्याची राजकीय कारकिर्द धोक्यात आल्याची जाणीव पाटील यांच्या समर्थकांना वाटू लागली आहे. त्यामुळे पुढे भविष्य काय असा प्रश्न त्यांच्या समर्थकांना पडला नसेल, तर नवलच म्हणावे लागेल.

### तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत

**भाजपाच्या हातातून रायगड लोकसभेचे तिकटी गेले आहे. असे असले, तरी आता भाजपाचे नेते हे तटकरेंसाठी मत मागत आहेत. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत, यावरच ते स्वतःचे समाधान करुन घेत असल्याचे चित्र आहे. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत याच टॅग लाईनचा मुस्लिम समाजाने शिताफीने वापर केला आहे. तटकरेंना मत दिले तर ते भाजपाच्या मोदींना जाणार आहे. त्यामुळे तटकरेंना मतदान करु नका, असा उलटा प्रचार त्यांनी सुरु केला असल्याचे विविध समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या संदेशातून दिसून येते.**

### सभेत एकच चर्चा, अमिषाने भरल्या

# रिकाम्या खुर्च्या

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने महायुतीने अलिबागमध्ये सभेचे आयोजन केले होते. मात्र, अमिष दाखवून अनेक मंडळींना बोलविल्याची चर्चा या सभेत रंगली होती. दोनशे रुपयांपासून पाचशे रुपयाचा भत्ता देऊन अनेकांना या सभेत पाचारण करण्यात आल्याचे बोलले जात होते. सभेमध्ये येणारी मंडळी पैसे देऊन येत नाही, तर स्वतः मर्जीने येतात, असा दावा करणाऱ्या तटकरेंची ही सभा निष्फळ ठरल्याचे दिसून आले आहे.

रायगड जिल्ह्यात प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरु झाली आहे. जस जसे मतदानाची तारीख जवळ येत आहे, तसतसा प्रचारदेखील वाढत आहे.

अलिबाग तालुक्यातील हाशिवरे येथे झालेल्या महायुतीच्या सभेलादेखील नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. गुरुवारी (दि.१८) उमेदवारी अर्ज भरण्याअगोदर रेवदंडा बायपास रस्त्यालगत महायुतीची सभा आयोजित केली होती. ही सभा भरगच्च वाटत असली, तरीही अनेक खुर्च्या रिकाम्या होत्या. खुर्च्या रिकाम्या दिसल्याने उभ्या असलेल्या मंडळींना खुर्च्यांमध्ये बसविण्यासाठी खुद्द आदिती तटकरे यांची धडपड सुरु असल्याचे पहावयास मिळाले.

वेगवेगळ्या भागातील मंडळींना या सभेसाठी पाचारण करण्यात आले. दोनशे रुपयांपासून पाचशे रुपये प्रती व्यक्ती भत्ता देऊन आणल्याची चर्चा या सभेत रंगली होती. त्यात काहींना भाजी-पूरी आणि काहींना बिर्याणी देण्याचे अमिष दाखविले होते. काहींना दोनशे रुपये तर काहींना पाचशे रुपये ठरल्याने काहींनी नाराजी व्यक्त केली. गाडीतून घेऊन येणाऱ्यांना चार हजार रुपये ठरल्याची चर्चा या सभेच्या निमित्ताने ऐकावयास मिळाली. महायुतीच्या सभेत अमिषाने भरलेल्या रिकाम्या खुर्च्यांची चर्चेने चांगलाच रंग धरल्याचे दिसून आले. रायगड लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सुनील तटकरेंनी अनेक ठिकाणी शक्तिप्रदर्शन केले. मात्र, ही शक्ती फारशी दिसून आली नाही. स्वतः मतदारांनी देखील त्यांच्या सभेला पाठ फिरवल्याने त्यांना चांगलाच घाम फुटला असल्याचे यावेळी दिसून आले.



# आई बाबांना भावनिक पत्र

। नागोठणे । वार्ताहर ।

आई बाबांना पत्र हा या मतदान जनजागृती अभियानाचा अनोखा उपक्रम नागोठणे येथे राबवला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी आईवडिल आणि घरातील इतर नातेवाईकांना पत्राद्वारे मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करुन एक भावनिक आवाहन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी आपल्या उज्वल भविष्यासाठी आपल्या पालकांना मतदान करण्यास सांगितले. सदर संकल्प पत्र विद्यार्थ्यांनी पालकांना वाचून दाखविले.

# गीतेंना अल्पसंख्याकांचा वाढता प्रतिसाद

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरात गीतेंच्या प्रचाराचा शुभारंभ मोठ्या उत्साहात झाला असून महत्त्वाची म्हणजे त्यांच्या प्रचारासाठी मोठया प्रमाणात मुस्लीम बांधव व भगिनींनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे. पेण शहरामध्ये कोल्हटकर वाडयातील गणपती मंदिरात प्रचाराचा नारळ फोडून महावीर मार्ग, मिर्ची गल्ली, नंदीमाळनाका या भागांमध्ये प्रचार करण्यात आला. प्रचारासाठी कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी, यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह



खान मोहल्ल्यातील मुस्लीम बंधू भगीनी मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी एकच घोषणा केली ती म्हणजे ‘गीते को जिताओ सविधान बचाव’. त्यामुळे आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंचा लोकसभा मतदार संघात प्रचाराचा झंझावत पहावयास मिळत आहे. पेणमध्ये अल्पसंख्यासह अन्य समाजातील मतदारांनीदेखील त्यांना पाठींबा दर्शविला. त्यामुळे या निवडणूकीत तेच विजयी होणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

या प्रचार रॅलीमध्ये कॉंग्रेसचे तालुका प्रमुख अशोक मोकल, शिवसेनेचे तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, कॉंग्रेस शहर प्रमुख प्रविण पाटील, शिवसेना शहर प्रमुख मुयेरश चाचड, शिशिर धारकर, जिल्हा संघटीका दिपश्री पोटफोडे, छाया काईनकर, वैशाली समेळ, राष्ट्रवादीचे स्वरूप घोसाळकर, अलिना हिना, कागदी, खान, यांच्यासह मोठया प्रमाणात पेणकर सहभागी झाले होते.

# मतपेट्याच्या संरक्षणासाठी पोलीस प्रशासन ऑनड्युटी

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदारसंघासाठी सात मे रोजी मतदान होत असून यासाठी आवश्यक मतपेट्या रवाना झाल्या आहेत. सात विधानसभाक्षेत्रांमध्ये मतपेट्यांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी खास स्ट्राँगरुम तयार करण्यात आले असून २४ तास पोलीस संरक्षणात इलेक्ट्रॉनिक मतपेट्या ठेवण्यात आल्या आहेत. मतपेट्यांची सरमिसळ केल्यानंतर या मतपेट्या सबंधित विधानसभा मतदारसंघात पंधरा दिवसांपूर्वीच पाठविण्यात आल्या.



या मतपेट्या सर्व तांत्रिक चाचण्या पार करूनच पाठविण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. पेण विधानसभा मतदार संघातील इलेक्ट्रॉनिक मतदान आणि व्हीव्हीपॅट यंत्र ठेवण्यासाठी कोकण एज्युकेशन सोसायटीच्या लिटील एन्जल स्कुलमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. तर अलिबाग-मुरुड विधानसभा मतदार संघातील मतपेट्या जेएसएम महाविद्यालयातील जिमखान्यात ठेवण्यात आल्या आहेत. श्रीवर्धनमधील न्यू इंग्लिश स्कूल व म्हसळामधील ज्युनियर कॅलेज येथे स्ट्राँगरुम तयार करण्यात आली आहेत. महाड विधानसभा हद्दीतील मतपेट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात ठेवण्यात आल्या आहेत. दापोली मतदार संघासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठातील सभागृहात व्यवस्था करण्यात आलेली आहे.

गुहागर मतदार संघातील मतपेट्या खेड येथील घरडा टेक्नॉलॉजी इमारतीमध्ये ठेवण्यात आल्या आहेत. मतपेट्यांच्या सुरक्षेसाठी दिवसरात्र पोलिसांचा सशस्त्र पहारा देण्यात येत आहे. याची संपूर्ण जबाबदारी सबंधित प्रांताधिकाऱ्यांकडे देण्यात आली आली आहे.

# मतदान वाढविण्यासाठी विविध उपक्रम



। नागोठणे । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध प्रकारे मतदान विषयक जनजागृती सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा तालुक्यातील नागोठणे विभागातील आदिवासी वाड्यांवर मागील लोकसभा व विधानसभा निवडणूकीत १५ टक्केपेक्षा कमी मतदान झाले आहे, त्या आदिवासी वाड्यांवर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवून मतदान विषयक जनजागृती मोहिम राबविण्यात आली. रायगड लोकसभा मतदार संघातील १९१-पेण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तसेच रोहाचे तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, रोहाच्या निवडणूक नायब तहसीलदार उज्वला अंधेरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मतदान जनजागृती मोहिम संपूर्ण तालुक्यात राबविण्यात आली.

नागोठणे विभागातील कोंडगाव आदिवासीवाडी, पिगोंडे, तामसोली आदिवासीवाडीसह इतर आदिवासीवाड्यांत राबविण्यात आलेल्या या मतदान जनजागृती उपक्रमात शाळकरी मुलांची प्रभातफेरी,स्पर्धा,पथनाट्य, ईव्हीएम पॅड व्हिकल डेमो दाखविण्यात आले. या मतदानविषयक जनजागृती उपक्रमात शाळकरी मुलांचे पालक, त्यांचे नातेवाईक, मुले, मुली, वयस्क नागरिक, अपंग बांधव सहभागी झाले होते.

# आगामी विधानसभेत आमच्यावरही लक्ष द्या

- **गोगावलेंचा पुन्हा तटकरेंना टोला**
- **तटकरेंबद्दल असलेला अविश्वास महायुतीच्या सभेत उघड**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

आम्ही तुम्हाला मदत करू, मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत आम्हाला मदत करा असा टोला आ. भरत गोगावले यांनी लगावला. सुनील तटकरे यांना विजयी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली. त्यांना तटकरेंनी फसविले आहे. त्यामुळे महायुतीमध्ये आजही तटकरेंबद्दल विश्वास नसल्याचे समोर आल आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांचा हात पकडून सूनील तटकरेंनी राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी तटकरे यांना राज्याचे मंत्री पद देत असताना त्यांच्या घरातचत अन्य मंत्रीपदासह आमदारकी दिल्या. तसेच शेकापचे नेते आ. जयंत पाटील, माजी आ. मधुकर ठाकूर यांनीदेखील तटकरेंना मदत केली होती. मात्र ज्यांनी ज्यांनी तटकरेंना मोठे केले, त्यांच्याशी विश्वासघात करण्याचे काम तटकरेंनी केल्याची राजकीय चर्चा जोर धरत आहे. त्यामुळे या निवडणूकीत शिवसेना, मनसे, भाजपचा हात पकडून उभे राहिलेले महायुतीचे उमेदवार तटकरे विश्वास घातकी असल्याची भीती महायुतीमध्येदेखील असल्याचे समोर आले. या निवडणूकीत तटकरेंना मदत करण्यासाठी महायूतीचे कार्यकर्ते काम करीत असले तरीही ते मनापासून नसल्याचे चर्चा सुरु आहे.

लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने महायुतीची सभा गुरुवारी पार पडली. या सभेत शिवसेना शिंदे गटाचे प्रतोद आ. भरत गोगावले म्हणाले, प्रत्येक आमदार विधानसभा मतदार संघातून तटकरेंना मताधिक्य देण्याची गॅरंटी घेईल. मात्र, पुढे सहा महिन्यात येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत आम्हालाही मदत करावी असे टोला गोगावले यांनी तटकरेंना लगावला. त्यांच्या या बोलण्यावरून तटकरेंबद्दल आजही अविश्वास असल्याचे समोर आले आहे.

# मावळमध्ये उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात

। उरण । वार्ताहर ।

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज गुरुवारी (दि.१८ ) भरण्यास प्रारंभ होत आहे. या मतदारसंघात महायुतीकडून श्रीरंग बारणे तर महाविकास आघाडीकडून संजोग वाघेरे यांना उमेदवारी दिली आहे. बारणे हे २२ एप्रिल रोजी, तर वाघेरे हे २३ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

मावळ लोकसभा मतदारसंघ हा पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागला आहे. पुणे जिल्ह्यातील पिंपरी, चिंचवड, मावळ आणि रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, कर्जत या मतदारसंघाचा समावेश आहे. यंदा पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक उमेदवारांमध्ये आणि दोन्ही शिवसेनेत लढत होत आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू झाली आहे. १८ ते २५ एप्रिल या कालावधीत अर्ज दाखल करता येणार आहेत. २६ एप्रिलला उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून २९ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. तर, १३ मे रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांची नेमणूक करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय कार्यालय आकुर्डीतील पीएम आरडीए कार्यालयाच्या सातव्या मजल्यावर आहे.

## मावळमध्ये उमेदवारांची दमछाक

**पिंपरी :** मावळ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार बारणे आणि महाविकास आघाडीचे वाघेरे यांचा गाठीभेटींवर भर आहे. बारणे यांनी घाटाखालील रायगड जिल्ह्यातील खोपोलीत, तर वाघेरे यांनी घाटावरील देहूरोड, तळेगाव दाभाडे शहरात पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. दोघांनीही गाठीभेटींवर भर दिला आहे. त्यामुळे उमेदवारांची प्रचार करताना दमछाक होताना दिसते.

## लोकसभा निवडणुकीत जुळणार | विधानसभा निवडणुकीचे गणित

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

मावळ मतदार संघातील पनवेल आणि मावळ विधानसभा मतदार संघात आपल्यालालाच आघाडी मिळेल असा आत्मविश्वास दोन्ही उमेदवार व्यक्त करत आहेत. मात्र, २०१९ साली पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन युती आणि आघाडीच्या उमेदवारांना पडलेल्या मतांची आकडेवारी पाहता राज्यात घडलेल्या अभूतपूर्व राजकीय घडामोडी नंतर बदललेल्या समीकरणानुसार आगामी लोकसभा निवडणुकीच्या निकालावर पनवेल आणि उरण विधानसभा मतदार संघातील उमेदवारीची गणिते जुळणार असल्याने लोकसभा निवडणुकीत आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या पारड्यात जास्तीत जास्त मत पाडून घेण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष कामाला लागले आहेत. २०१९ साली विधानसभा निवडणुकी भाजपा आणि शिवसेना एकत्र होते. त्यावेळी पनवेल विधानसभेची जागा भाजपाच्या वाट्याला आल्याने प्रशांत ठाकूरासाठी शिवसेनेचे पनवेलमधील कार्यकर्ते झटले होते. याचाच फायदा होऊन त्यांनी ९२ हजारा पेक्षा जास्तच्या मताधिक्याने विजयी झाले होते तर शेतकरी कामगार पक्ष आघाडीकडून लढलेल्या हरेश केणी यांच्या पारड्यात ८६ हजारा पेक्षा जास्तची मते पडली होती.

यंदा मात्र हे गणित बदलणार आहे. दुभंगलेल्या शिवसेनेचा एक गट भाजपा सोबत तर दुसरा गट शेकाप, राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस सोबत मैदानात आहे. सध्याची राजकीय समीकरण पाहता पनवेल विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना लाखा पेक्षा जास्तचे मताधिक्य मिळवून देण्याचा संकल्प आ. ठाकूर यांनी केला असला तरी तालुक्यातील मतदारांचा नैना विरोधात असलेला रोष तसेच पालिकेच्या मालमत्ता करा विरोधात असलेल्या रोशातून कॉलनी फोरमने नुकताच उद्धव ठाकरे गटात केलेल्या प्रवेशामुळे तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेर पाटील यांना यंदा शेकाप, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीची साथ मिळणार असल्याने लोकसभा निवडणुकीत बारणे यांना आघाडी मिळवून देण्यावर आमदार प्रशांत ठाकूर यांचे विधानसभेचे गणित ठरणार आहे.

### पनवेलपेक्षा उरण अवघड

**२०१९ साली पनवेल विधानसभा मतदार संघात महायुतीतील घटक पक्षातील कार्यकर्ते एकदिलाने कामाला लागले होते.त्याच वेळी शेजारील उरण मतदार संघात मात्र, भाजपाच्या महेश बालदी यांनी बंडखोरी करत महायुतीचे उमेदवार मनोहर भोईर याच्या विरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवत महायुतीचे गणित बिघडवले.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकाला नुसार ७४ हजार ५५९ म्हणजेच ३४ टक्के मतदारांनी अपक्ष उमेदवार बालदी यांच्या पारड्यात आपली मत टाकली त्या खालोखाल महायुती मधील घटक पक्ष असलेल्या शिव सेनेचे उमेदवार मनोहर भोईर यांना ६८ हजार ८३९ म्हणजेच ३१ टक्के तर शेतकरी कामगार पक्ष आघाडीकडून निवडणूक लढलेल्या विवेकानंद पाटील यांना ६१ हजार ६०१ म्हणजे २८ टक्के मतदारांनी आपली पसंती दर्शवली होती.निकालानंतर मतांच्या टक्केवारी नुसार पराभूत झालेल्या उमेदवारांना मिळालेल्या टक्केवारीचा आकडा विजयी उमेदवारा पेक्षा जास्त असल्याने तसेच विरोधात लढलेले दोन्ही पक्ष आता एकत्र असल्याने बारणे यांच्या पारड्यात जास्तची मत टाकण्यासाठी आ. बालदी यांना झगडावे लागणार आहे.**

# दादांची का सटकली?

**आधी होता वाघ्या, त्याचा झाला पाग्या,**
**त्याचा येळकोट राहिना, मूळ स्वभाव जाईना**

संत तुकारामांनी पाचशे वर्षांपूर्वी मनुष्यप्रवृत्तीचे केलेले हे वर्णन आहे. माणसाला मोठे पद मिळाले की प्रतिष्ठा मिळते. पण त्याचा मूळ स्वभाव काही लपून राहू शकत नाही असा त्याचा भावार्थ आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांना तर हा अभंग एकदम लागू पडतो. इतका की तो दादा आणि त्यांच्यासारखेच आणखी काही नेते यांच्यासाठीच लिहिला होता की काय असे वाटावे. समोर गर्दी दिसली की आम्ही नेते मंडळींची जीभ सुटते अशी कबुली खुद्द दादांनी नंतर दिलेली आहे. पण तरीही ते स्वतःच यातून काही शिकायला तयार नाहीत असे दिसते. बोलण्याच्या भरात त्यांचा तोल कसा जातो हे पूर्वी दिसले आहे. धरणातल्या पाण्याबाबत त्यांनी केलेले वक्तव्य त्यांना उपाधीसारखे कायमचे चिकटले आहे. एकेकाळी भाजपवाल्यांनी याच वक्तव्यावरून मोठा गहजब केला होता. दादा मग कऱ्हाडला गेले. यशवंतरावाच्या समाधीजवळ दिवसभर बसून प्रायश्चित्त केले. पण पुन्हा येरे माझ्या मागल्या. बारामतीच्या जागेमुळे दादांना फारच टेन्शन आलेले दिसते. बुधवारी इंदापूरला प्रचार सभेत त्यांची जीभ पुन्हा सटकली. डॉक्टरांच्या मेळाव्यात बोलताना ते म्हणाले की, लोकांना तपासताना त्यांच्या मनात काय ते विचारा. आमचे नाव घेतले तर ठीक नाहीतर त्यांना असे इंजेक्शन टोचा की.... हे वाक्य त्यांनी पूर्ण केले नाही व नंतर माफी मागितली. पण लोकशाहीमध्ये एखाद्या नेत्याने आपल्याला विरोध करणाऱ्या मतदारांना अद्दल घडवण्याची भावना मनात ठेवावी व तशी भाषा उघडपणे करावी हे भयंकर आहे. अनेक वार निवडणुका लढवल्या व जिंकल्या म्हणून नेते लोकशाहीवादी झाले असे होत नसते. जो आपल्याला विरोध करेल त्याला आडवा करा, मारा, झोडा ही खास सरंजामी वृत्ती झाली. गढीवरचे जमीनदार, सरदार हे मध्ययुगामध्ये असा उन्मत्तपणा करीत असत.

## नेते की बनिया?

लोकशाहीचा अर्थच असा आहे की, माणसांची मते भिन्न असू शकतात. प्रामाणिकपणे ती ते नोंदवू शकतात. या विरोधकांचे बहुमत असले तर सत्ताच त्यांच्याकडे जाते. पण समजा ते अल्पमतात असले तरी त्यांचा सन्मान करायचा असतो. पण दादांना हे मान्य नाही. आपल्याला मते न देणारा तो आपला शत्रू असे त्यांच्या मनाने घेतलेले आहे. म्हणूनच ते आणखीही एक धमकी सतत देत असतात. मला मते दिली नाहीत तर तुम्हाला सरकारचा निधी मिळणार नाही. इंदापूरच्या व्यापाऱ्यांच्या सभेत त्यांनी याचा पुनरुच्चार केला. मतदान यंत्रावर कचाकचा बटणं दाबा आणि आम्हाला मते द्या, नाहीतर मग मला तुम्हाला निधी देताना माझा हात आखडता येईल, असे ते म्हणाले. दादांचा हा आवडता इशारा आहे. वेळोवेळी तो त्यांनी खराही करून दाखवला आहे. आपल्या विरोधकांनाच नव्हे तर आघाडीतल्या अन्य पक्षाच्या लोकांनाही ते निधी देत नाहीत ही जुनी तक्रार आहे. आता शिंदे गटवाले विसरले असतील, पण शिवसेनेतून फुटून बाहेर पडताना त्यांनी दादांवर याबाबत आरोप केले होते. एकाच सरकारात असूनही दादा सेनेला निधी देत नव्हते असे त्यांचे म्हणणे होते. गंमत अशी की नव्या सरकारात पुन्हा हेच दादा अर्थमंत्री म्हणून त्यांच्या नशिबी आले. त्यावेळी भरत गोगावलेंना मंत्रिपदाच्या ऐवजी शेकडो कोटींचा निधी देण्यात आला. पण सर्वांच्याच बाबत न्याय झाला असे नाही. उलट काँग्रेस आणि ठाकरे सेनेच्या अनेक आमदारांना एक पैसाही मिळाला नाही. हा निधी म्हणजे दादा स्वतःच्या खिशातून काढून देत नसतात. तो सरकारचा म्हणजेच जनतेचा पैसा असतो. दादांनी तेथे एक विश्वस्त म्हणून जबाबदारीने काम करावे अशी अपेक्षा असते. पण ते एखाद्या व्यापाऱ्याप्रमाणे भाषा करतात व त्यात त्यांना मोठा पराक्रम वाटतो.

## विधानसभेची भीती

पूर्वी दादांच्या या भाषेला चाप लावायला शरद पवार किंवा त्यांच्यासारखे नेते होते. आता दादा स्वतःचे स्वतः मुखत्यार आहेत. आणि ते आता ज्यांच्यासोबत आहेत ते तर अट्टल बनिया आहेत. ते दादांना काय बोलणार? विरोधकांच्या मागे इडी लावायची, ते आपल्या पक्षात आले तर चौकशी बंद करायची, कंपन्यांकडून इडी लावून निवडणूक देणगी मिळवायची असे अनेक उपक्रम दादांच्या सध्याच्या सहकाऱ्यांच्या नावावर जमा आहेत. दिल्लीच्या निवडणुकीत अमित शाह यांनी नागरिकता कायद्याला विरोध करणाऱ्यांना विजेचा जोरदार झटका बसेल असे मतदान करा असे लोकांना आवाहन केले होते. ते दादांना त्यांच्या इंजेक्शनच्या वक्तव्याबाबत काय सबुरीचा सल्ला देणार? दादांनी आपल्या जिभेला थोडा लगाम देण्याची गरज आहे. पण त्यासाठी आपल्या विचारातच गडबड आहे हे त्यांना कळावे लागेल. दादा हे लोकप्रिय नेते आहेत. प्रशासनातील कामे भराभर मार्गी लावण्याबाबत त्यांची प्रसिध्दी आहे. पण म्हणून आपल्याला मते न देणाऱ्यांना धमक्या देण्याचा परवाना त्यांना मिळालेला नाही. दादांचे मंत्री म्हणून काम ठीक असेल, पण त्यांनी भाजपसारख्या पक्षाशी युती करणे अनेकांना पसंत नसेल व नाही. त्याबद्दल विरोधी मत देण्याचा अधिकार घटनेनेच जनतेला दिलेला आहे. आज दादा मोदींची तोंडफाट स्तुती करतात व बारामतीच्या विकासात काकांपेक्षाही माझाच अधिक वाटा आहे असे सुचवतात. हे अनेकांना न आवडणारे आहे. त्यामुळेच एबीपीच्या ताज्या सर्वेक्षणामध्ये दादांच्या राष्ट्रवादीला राज्यात एकही जागा जिंकता येणार नाही असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कदाचित याच अंदाजामुळेही दादा सैरभैर झाले असावेत. बारामतीत सर्व पवार कुटुंब दादांच्या विरोधात गेले आहे. सातारा लढवणारच ही दादांची घोषणा पाहता पाहता हवेत विरली आहे. भाजपने ती जागा हिसकावून घेतली आहे. रायगडात शिंदे गट व भाजपवाले राष्ट्रवादीचा कार्यक्रम करणार हे नक्की आहे. आज ही स्थिती असेल तर विधानसभेचे काय ही भीती भेडसावत आहे. म्हणून दादांची सटकली आहे.

विचार

# तिरंगी लढत पटनायक बाजी मारणार?

**जागावाटपावरून भारतीय जनता पक्ष आणि बीजू जनता दलाची युती तुटली. येथे काँग्रेसनेही उमेदवार दिले असले, तरी खरी लढत भाजप आणि बीजू जनता दलामध्ये होणार आहे. दलबदलूंना येथे मोठ्या प्रमाणात उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने आव्हान दिले असले आणि बीजू जनता दलात उत्तराधिकाऱ्यावरून वाद असला तरी येथे बीजू जनता दलच बाजी मारण्याची शक्यता आहे.**



**नवीन महाजन**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक एकाच वेळी पार पडत असल्यामुळे ओडिशामध्ये निवडणुकीचे रण तापले आहे. राज्यात विधानसभेच्या १४७ जागांसाठी चार टप्प्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. १३, २० आणि २५ मे तसेच एक जून रोजी चार टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. युती न झाल्याने सर्व विधानसभा जागांवर भाजप आणि बीजेडी आमनेसामने आहेत. अर्थात काँग्रेसही निवडणुकीच्या रिंगणात आहे. सर्वांच्या नजरा हिंजली या जागेवर आहेत. तिथे भाजपचे शिशिर मिश्रा यांच्या विरोधात मुख्यमंत्री नवीन पटनायक निवडणूक लढवत आहेत. ओडिशा विधानसभेतील विरोधी पक्षनेते जयनारायण मिश्रा यांना संबलपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. बीजेडीने आतापर्यंत ९९ जागांसाठी तर भाजपने ११२ जागांसाठी आणि काँग्रेसने ७५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. ओडिशामध्ये लोकसभा निवडणूक चार टप्प्यांमध्ये होणार आहे. राज्यात विधानसभेत बीजू जनता दलाचे बहुमत आहे. भाजप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चेहऱ्यावर लोकसभा निवडणूक लढवत आहे. याआधी दोन्ही पक्षांमध्ये युतीची चर्चा होती; मात्र अखेरच्या क्षणी ही चर्चा संपुष्टात आली. भाजप लोकसभेत जास्त जागांची मागणी करत होता तर विधानसभेत बीजेडीला मोठ्या भावाचा दर्जा देण्याची ऑफर दिली होती; परंतु पटनायक यांनी त्याला नकार दिला. बीजू जनता दल आणि भाजपने लोकसभेच्या सर्व २१ जागांवर उमेदवार उभे केले. काँग्रेसही रिंगणात आहे. त्यामुळे निवडणूक तिरंगी झाली आहे.

या निवडणुकीत भाजपने धर्मेंद्र प्रधान, संबित पात्रा आणि जुआल ओराव या जुन्या नेत्यांना उमेदवारी दिली आहे. याशिवाय बीजू जनता दल सोडून भाजपमध्ये दाखल झालेल्या भर्तृहरी महताब यांच्यासारख्या नेत्यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. बीजू जनता दलाने पुरी आणि कटक लोकसभा जागांसह अनेक भागात उमेदवार बदलले आहेत. ओडिशाच्या केंद्रपारा लोकसभा मतदारसंघातील बीजू जनता दलाचे खासदार अनुभव मोहंती यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत दोन माजी आमदारांसह अन्य काही नेत्यांनी पक्षात प्रवेश केला. मोहंती यांनी बीजू जनता दलाचा राजीनामा दिला. गेल्या महिनाभरात चार विद्यमान आमदार आणि अंदाजे तेवढ्याच माजी आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. याशिवाय भर्तृहरी महताबसारखे ज्येष्ठ खासदारही भाजपमध्ये दाखल झाले आहेत. ते सहा वेळा खासदार राहिले आहेत. भाजप त्यांना कटकमधून उमेदवारी देऊ शकते. आता अनुभव मोहंती यांनी पक्षात प्रवेश केला आहे. राज्यात विधानसभा निवडणुकाही होणार आहेत. अशा स्थितीत ओडिशामध्ये जवळपास अडीच दशके सत्तेवर असलेल्या नवीन पटनायक यांच्यासाठी आमदार, खासदारांचे पक्षांतर हा चिंतेचा विषय आहे. अशा परिस्थितीत अनेक बडे नेते नवीन पटनाईक यांना सोडून भाजपमध्ये का जात आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ओडिशामध्ये फार पूर्वीपासूनच भाजपची फारशी ताकद नव्हती. तथापि, २०१४ पासून पक्ष ओडिशामध्ये विस्तारला. आहे. याशिवाय संबित पात्रा, धर्मेंद्र प्रधान, बैजयंत जय पांडा या नेत्यांना पदोन्नती देऊन वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बैजयंत जय पांडा बीजू जनता दलातून भाजपमध्ये आले आहेत. त्यांनी बंडखोर नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मानले जात आहे. भाजप आणि बीजू जनता दलामध्ये युती न झाल्याने अनेक नेत्यांचे पक्षांतर सुरू आहे. भर्तृहरी महताब यांच्यासारखे नेते बीजू जनता दलाच्या स्थापनेपासून पक्षात होते. त्यांचे जाणे नवीन पटनायक यांच्यासाठी मोठा धक्का आहे. ओडिशाच्या राजकारणातील तज्ज्ञांच्या मते यामागील मुख्य कारण म्हणजे उत्तराधिकारी पदाचा संघर्ष. नवीन पटनायक यांना त्यांचा राजकीय वारसा सुपूर्द करता येईल, असे कोणतेही कुटुंब नाही. आता त्यांचे वय वाढत आहे आणि माजी आयएएस व्ही. के. पांडियन त्यांच्याशी साधत असलेली जवळीक पाहता अनेक नेते अस्वस्थ आहेत. पांडियन सर्व महत्त्वाचे निर्णय घेतात आणि इतर ज्येष्ठ नेत्यांचे मत पूर्वीसारखे गांभिर्याने घेतले जात नाही. त्यामुळे जुने नेते भविष्याबाबत असुरक्षित आहेत. त्याच वेळी ते सतत मजबूत होत असलेल्या भाजपकडे स्वतःसाठी सुरक्षित आश्रयस्थान म्हणून पाहत आहेत. अशा प्रकारे बीजू जनता दलातील कठीण भवितव्य आणि भाजपमधील सुरक्षित भविष्य पाहून नेते पळ काढत आहेत.

सहा वेळा खासदार राहिलेले भर्तृहरी यांनी यासंदर्भात बोलताना सांगितले की, आता त्यांचा बीजेडीबाबत भ्रमनिरास झाला आहे. पटनायक यांना का सोडले हे सांगताना ते म्हणाले, की १९९७ मध्ये आम्ही स्थापन केलेला बीजू जनता दल आता राहिला नाही. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये भ्रष्टाचार आणि बलात्काराचे आरोप असलेल्यांनाही तिकीट मिळत आहे. सत्तेत आल्यानंतर नवीन पटनायक सर्व नेत्यांचा सल्ला घेत असत आणि राजकीय सल्लागार समिती स्थापन करण्यात आली होती. आता अशी समितीच अस्तित्वात नाही. आता आदेश येतात आणि त्यांचे पालन करावे लागते. लोकसभा निवडणुकीदरम्यान नेत्यांचे पक्ष बदलण्याची प्रक्रिया सुरू आहे. गेल्या काही निवडणुकांपासून पक्षांतर करणाऱ्यांना जनतेने धडा शिकवायला सुरुवात केली आहे; तरीही नेते काही पक्ष बदलण्याचे थांबवत नाहीत आणि पक्षही दलबदलूंना प्राधान्याने उमेदवारी देतात. यामध्ये प्रादेशिक पक्ष आणखी पुढे असल्याचे दिसत आहे. बीजू जनता दलाने विधानसभा निवडणुकीसाठी नऊ उमेदवारांची चौथी यादी आणि लोकसभा निवडणुकीसाठी एक उमेदवार जाहीर केला. बीजू जनता दलाने भाजपमधून आलेल्या लेखश्री सामंत सिंगर यांना बालासोर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. लेखश्री या भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा होत्या. त्या मुख्यमंत्री नवीन पटनायक यांच्यावर जोरदार टीका करत असत; पण तिकीट मिळण्याच्या अवघ्या चार दिवस आधी त्या राज्यातील सत्ताधारी बीजू जनता दलात सामील झाल्या.

पटनायक यांच्या नेतृत्वाखालील बीजू जनता दलाने लोकसभा निवडणुकीसाठी आठ दलबदलू उमेदवार उभे केले आहेत. ते भाजप आणि काँग्रेसमधून आले होते. अद्याप कोणत्याही पक्षाने विधानसभा मतदारसंघांची संपूर्ण यादी जाहीर केलेली नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बीजू जनता दलाला बारा जागा मिळाल्या होत्या. भाजपने आठ, तर काँग्रेसने एक जागा जिंकली होती. बीजू जनता दलाने बालासोरमधून लेखश्री सामंतसिंह यांना केंद्रीय मंत्री आणि विद्यमान खासदार प्रताप सारंगी यांच्या विरोधात रिंगणात उतरवले आहे. त्याच वेळी, केंद्रपारा येथे काँग्रेसचे माजी नेते अंशुमन मोहंती हे बीजू जनता दलाकडून भाजपच्या बैजयंत जय पांडा यांच्या विरोधात लढतील. पांडा यांनी २०१८ मध्ये बीजू जनता दल सोडले. गेल्या निवडणुकीत बीजू जनता दलाच्या अनुभव मोहंती यांच्याकडून पांडा यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. बीजू जनता दलाने नबरंगपूरमधून काँग्रेसचे माजी खासदार प्रदीप मांझी यांना उमेदवारी दिली आहे. मांझी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या तिकिटावर ही जागा जिंकली होती. मांझी २०२१ मध्ये बीजू जनता दलात दाखल झाले.

काँग्रेसचे आमदार सुरेश राउत्रे यांचे चिरंजीव मन्मथ राउत्रे हे भुवनेश्वरमधून भाजप खासदार अपराजिता सारंगी यांच्या विरोधात निवडणूक लढवणार आहेत. ३८ वर्षे काँग्रेससोबत राहिल्यानंतर बीजू जनता दलात प्रवेश केलेल्या सुरेंद्रसिंग भोई यांना बलांगीर मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत विविध पक्षांच्या १९५ उमेदवारांसह आठ हजारांहून अधिक उमेदवार रिंगणात होते. म्हणजेच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये एकूण उमेदवारांपैकी २.४ टक्के पक्षांतर करणारे उमेदवार होते. या १९५ पैकी केवळ २९ नेते विजयी झाले होते. मागील निवडणुकीत त्यांच्या यशाचे प्रमाण १४.९९ टक्के होते. दोन निवडणुकांपूर्वी दलबदलू नेत्यांच्या यशाचे प्रमाण जवळपास दुप्पट होते. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत दलबदलू उमेदवारांच्या यशाचा दर २६.२ टक्के होता.

आजकाल

# आयपीएलमधील उगवते सितारे

इंडियन प्रिमियर लीग' अर्थात 'आयपीएल'चा १७ वा हंगाम सुरु झाला आणि नेहेमीप्रमाणेच नवीन खेळाडूंकडे लक्ष जायला सुरुवात झाली. या स्पर्धेने क्रिकेट रसिकांना कायमच आश्चर्यचकित केले आहे. आपल्या देशातील, विविध भागातील अनेक उत्तमोत्तम खेळाडू याच स्पर्धेने कायम पुढे आणले आहेत. उदाहरणार्थ, मयांक यादव. लखनौ सुपर जायंट्स संघातून खेळणारा दिल्लीचा गोलंदाज. काहीच दिवसांपूर्वी पंजाब विरुद्धच्या सामन्यात त्याने आयपीएलमध्ये पदार्पण केले, आणि पहिल्याच सामन्यात क्रिकेट रसिकच नव्हे तर समीक्षकांची देखील मने जिंकून घेतली. तुफान वेगाने गोलंदाजी करणारा हा गोलंदाज लगोलग क्रिकेट रसिकांच्या गळ्यातला ताईत बनला. चारच दिवसांनी बंगलोर विरुद्धच्या सामन्यात देखील त्याने प्रभावी कामगिरी केली. दोन्ही सामन्यात त्याने ३-३ बळी तर घेतलेच, पण विशेष म्हणजे त्याचा गोलंदाजीचा वेग. दोन्ही सामन्यात तो कायम १५० किलो मीटर प्रति तास या पेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करताना दिसला. एकवेळ तर त्याने १५६.७ या वेगाने चेंडू टाकला. भारतीय गोलंदाजी बदलली आहे हे नक्की. लगेचच क्रिकेट रसिकांनी त्याला 'स्टार' संबोधून भारतीय संघात त्याची वर्णी देखील लावली.

मयांकची गोलंदाजी सुरेख आहे यात काहीच वाद नाही. पण अजूनही तो तसा कच्चा आहे. त्याला अजूनही मेहनत करण्याची आवश्यकता आहे. तो दोन सामने खेळला, दोन्ही सामन्यात मिळून त्याने ८ षटके टाकली. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात, दिल्ली संघाविरुद्ध एक षटक टाकल्यानंतर त्याला दुखापत झाली आणि त्यानंतर त्याला सामना सोडावा लागला. अशावेळी त्याला जपणे, त्याची काळजी घेणे, त्याचा 'वर्कलोड' मॅनेज करणे किती महत्वाचे आहे ते लक्षात येते.

या स्पर्धेत गवसलेला अजून एक तारा म्हणजे पंजाबचा शशांक सिंग. कोणाचीही अपेक्षा नसताना गुजरात विरुद्धच्या सामन्यात त्याने जबरदस्त फटकेबाजी करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. त्या दिवशी अहमदाबादच्या मैदानावर त्याने चौकार-षटकारांची आतषबाजी केली. २९ चेंडूत ६१ धावा करत त्याने आपल्या संघाला विजय मिळवून दिला. शशांक आता वयाच्या तिशीत आहे. या वयात कदाचित तो भारतीय संघाची जर्सी परिधान करणार नाही, पण आयपीएल सारख्या स्पर्धेने त्याची गुणवत्ता बाहेर काढली. जी गोष्ट शशांकची तीच अंगक्रिश रघुवंशीची. कोलकाता संघासाठी खेळताना तो देखील चमकतो आहे. हैदराबादचे प्रतिनिधित्व करणारे अभिषेक शर्मा आणि नितीश कुमार रेड्डी, मुंबई इंडियन्स साठी खेळणारे नमन धीर, नेहल वढेरा किंवा आकाश मढीवाल, चेन्नई साठी चमकत असलेले

समीर रिझवी, तुषार देशपांडे, लखनौ साठी खेळत असलेले देवदत्त पडिकल आणि यश ठाकूर, गुजरात संघाचा दर्शन नळकांडे, राजस्तान संघाचा रियान पराग अशी एक ना अनेक नावे या वर्षीच्या स्पर्धेत गाजत आहेत. भारतीय क्रिकेट रसिक म्हणून हे चित्र खरोखर सुखावणारे आहे. पण तरीही काही गोष्टींची काळजी घेणे, काही गोष्टी 'मॅनेज' करणे आवश्यक आहे असेही वाटते. आयपीएलच्या १६-१७ वर्षांच्या इतिहासात, या स्पर्धेने भारतीय संघाला एकापेक्षा एक दर्जेदार खेळाडू दिले आहेत. पण त्याचबरोबर अनेक खेळाडू फक्त त्या स्पर्धेपुरते टिकले आहेत हे देखील विसरून चालणार नाही. आयपीएल बाहेर, खास करून भारतीय 'अ' संघ, किंवा भारतीय संघासाठी खेळताना मात्र ते तितके प्रभावी ठरू शकले नाहीत. उदाहरणच द्यायचे झाले तर आता किती क्रिकेट रसिकांना सुदीप त्यागी किंवा मनप्रीत गोणी ही नावे आठवत असतील? आयपीएल मध्ये केलेल्या प्रभावी कामगिरी नंतर त्यांना भारतीय संघासाठी देखील खेळण्याची संधी मिळाली, पण त्या संधीचा ते फायदा उठवू शकले नाहीत. पवन नेगी सारखा खेळाडू २०१६-१७ मध्ये कैक कोटींच्या किमतीला आयपीएलमध्ये विकला गेला, पण पुढे जाऊन तो ना त्याच्या संघासाठी प्रभावी कामगिरी करू शकला, तर भारतीय संघासाठी देखील केवळ एकच सामना खेळू शकला. खेळाडूंचा वैयक्तिक विचार करता, आयपीएलने त्यांना खूप काही दिले आहे यामध्ये अजिबात दुमत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूला आयपीएलच्या स्थैर्य दिले. १९९० अथवा २००० च्या दशकात देखील रणजी ट्रॉफी किंवा इतर स्पर्धा खेळणाऱ्या खेळाडूंची हालत फारशी चांगली नव्हतीच. एकीकडे भारतीय संघातील खेळाडूंचे लाड होत असले तरी देशांतर्गत क्रिकेटला कोणीही विचारात नव्हते. अशावेळी कोणतेही आई-वडील आपल्या मुलाला क्रिकेटकडे, किंवा कोणत्याही खेळाकडे लक्ष देण्यापासून परावृत्तच करत होते. आयपीएलमुळे हे खेळाडू चार पैसे कमावू शकले यात काहीच शंका नाही. कोणत्याही खेळातील सर्वात खालचा थर, तो खेळाडू सक्षम झाला तर खेळ मोठा होतो. आयपीएलमुळे क्रिकेटच्या बाबतीत हेच घडले. हे खेळाडू स्थिरावण्यास आयपीएलचा मोठा हातभार आहे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आयपीएलने या खेळाडूंना एक मोठा प्लॅटफॉर्म दिला. आयपीएल सुरुवातीपासूनच एक पूर्णपणे व्यावसायिक लीग होती. या लीगने प्रेक्षकांबरोबरच प्रायोजक, जाहिरातदार, मोठमोठे उद्योजक आणि अनेक सेलिब्रिटींना जवळ आणले.

लोकसंसद

## सुट्टीत मुलांना वेळ द्या!

समस्त शाळकरी मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून आता उन्हाळी सुट्टी पडली आहे. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळत असे. आता मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये त्यांची पुरती दमछाक होत आहे. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र काही पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात. मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**एकोणीस एप्रिल**

**१८२७:-** अमेरिकन ख्रिस्ती लेखिका मेरी एलिझाबेथ बिसेल यांचा जन्म. त्यांनी महाराष्ट्रात आल्यावर मराठी भाषा आत्मसात करुन स्वत: काही गीते रचून गीतांची पुस्तके तयार केली ती गीते 'सेक्रेड साँग' या पुस्तकात अंतर्भूत आहेत. 'देव प्रीतीची प्राचीन गोष्ट' व 'दुसरी गायने' ही त्यांची भाषांतरीत पुस्तके असून 'बुलबुल-लेकरांकरिता', 'मंजुळ गायने आणि उपासना संगीत' या पुस्तकातही त्यांची काही गीते आढळतात. याशिवाय 'एका आईचे शेवटचं भाषण', 'ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध' आणि 'शास्त्रात वर्णिलेल्या स्त्रिया व नव्या करारात वर्णिलेल्या स्त्रिया' ही भाषांतरीत पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. १८९२ : ज्या काळात भारतात आधुनिक शिक्षणाचा फारसा प्रचार झालेला नव्हता त्या काळात शिक्षणतज्ञ असा नावलौकिक संपादन करणाऱ्या ताराबाई कृष्णाजी मोडक यांचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजी झाला. त्यांचे माहेरचे आडनाव केळकर, मुंबईच्या गर्ल्स हायस्कूलमधून मॅट्रिक झालेल्या ताराबाईंनी एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी संपादन केली. १९१५ साली कृष्णाजी वामन मोडक यांच्याशी त्यांचा विवाह झाला. ताराबाई मोडक काही काळ राजकोटच्या बार्टन फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्या होत्या. पुढे मुंबईत बालशिक्षणाच्या प्रचाराचे काम केले. कोसबाड येथे वारली वस्तीत त्यांनी 'विकासवाडी' ची स्थापना केली. नंतर त्यांनी शिक्षण परिषदेची अखिल भारतीय स्थापना केली. नंतर त्यांनी शिक्षण परिषदेची अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या बालशिक्षण विभागाच्या अध्यक्ष होण्याचा दोनदा बहुमान त्यांना लाभला होता. त्यांच्या साहित्यिक योगदानात शिक्षणपत्रिका या मराठी गुजराती व हिंदी भाषेत प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांचे संपादन केले. तसेच पालकांसाठीही त्यांनी पुस्तके लिहिली. 'आपले घर' या पुस्तकातून त्यांनी बालकांचा योग्य विकास होण्यासाठी पालकांना मार्गदर्शन केले. याशिवाय बालकांचा हट्ट, बालविकास व शिस्त, बिचारी बालके तसेच मुलांसाठी नदीची गोष्ट. सवाई विक्रम, निकमाची साडेसाती, बादशहा आणि बिरबल यांच्या गोष्टी. गंपूदादांच्या लाकडदंड्या, साडेसाती तसेच 'बालवाडी इन रूरल एरिआ' आणि मेडोस्कूल ही इंग्रजी आजीबाईंच्या गोष्टी आदी पुस्तके त्यांच्या नावावर जमा आहेत. त्यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल 'पद्मभूषण' हा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले. ३१ ऑगस्ट १९७३ रोजी त्यांचे निधन झाले. **१८९५:-** साहित्यिक केशव नारायण वाटवे यांचा जन्म. 'रसवितर्श' या प्रबंधातून त्यांनी संस्कृत साहित्यातील रसव्यवस्थेचे पाश्चात्यांच्या मानसशास्त्राच्या आधारे विवेचन केले. 'संस्कृत काव्याचे पंचप्राण' या ग्रंथातून संस्कृत पंच महाकाव्याचे तर 'संस्कृत नाट्यसौंदर्य' या ग्रंथातून नऊ निवडक नाटकांचे परिशीलन त्यांनी केले. 'संस्कृत साहित्यातील विनोद' मधून विदुषक या संकल्पनेची चर्चा केली. तसेच 'प्राचीन मराठी पंडीती काव्य' व 'पंडिती काव्य' या ग्रंथातून पंडीती काव्याचे समीक्षण त्यांनी केलं. याशिवाय 'नलदमंयती कथा', 'किरातर्जुनाय कथा' ही पुस्तके आणि 'माझी वाटचाल' हे आत्मकथन लिहिले. **१९१३:-** लेखिका, बालसाहित्यिका, सामाजिक कार्यकर्त्या 'शिक्षण पत्रिका' या मासिकाच्या संपादकीय सदस्य सरलाताई देवधर यांचा जन्म. ह्यांच्या नावावर 'एक होता वाघोबा', 'कोंबडीला साले कणीसफ,'गोपाळ काला', 'छोटी छोटी नाटूकली', 'हा घोडा गाडीवाला' हे बालसाहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९२५:-** इतिहास संशोधक प्रा. अनंत रामचंद्र कुळकर्णी यांचा जन्म. लंडन विद्यापीठात ते रीसर्च स्कॉलर म्हणून गेले असता तेथील मराठी कागदपत्रांचा अभ्यास करुन त्यांनी शिवकालीन महाराष्ट्रांवर 'महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी' हा प्रबंध इंग्रजीत लिहिला. पुढे शिवाजी विद्यापीठाने त्यांचा अनुवाद 'शिवकालीन महाराष्ट्र' नावाने प्रकाशित केला. त्यांच्या इतिहासविषयक लेखनापैकी 'आंतरराष्ट्रीय संस्था' व 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ यांचे चरित्र' तसेच या डफने लिहिलेल्या मराठेशाहीच्या इतिहासाचा मराठी अनुवाद प्रकाशित झाले. 'भारतीय संस्कृतीदर्शन' आणि 'इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास' या पुस्तकांचे सहसंपादन त्यांनी केले होते. **१९३६:-** लेखक, उद्योजक अशोक गोविंद घैसास यांचा जन्म. 'श्रीरामनगरचे रामदास' हा चरित्रग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९६२:-** लेखक डॉ. आनंद सदाशिव सहस्त्रबुध्दे यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'सोलर प्लॉट २४ आणि इतर कथा व कथासंग्रह : मरुत-४', 'गोल्डन सिटी' या कादंबऱ्या तसेच डॉ.आनंद यांची 'आपले विश्व', 'शोधन आणि संशोधन', 'मापन, चलन आणि उर्जा', 'अभ्यास करणारा कॉम्प्यूटर', 'म्हातारा ग्रह', 'बर्फाळ ग्रह', ही विज्ञान विषयक पुस्तके याशिवाय 'परिचय मूल्य शिक्षणाचा' हे शैक्षणिक तर 'माझा आदर्श', 'चॅम्प' ही अनुवादीत पुस्तके अशी साहित्य संपदा. **१९६६:-** योगविषयक पुस्तके लिहिणारे लेखक, कवी आणि 'कैवल्यधाम' योग संस्थेचे संस्थापक. योगगुरु जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद यांचे निधन. 'योगीमीमांसा' हे मराठी मासिक त्यांनी १९२४ मध्ये सुरु केले. योगासनांवर इंग्रजीत पुस्तक लिहून (१९३१) योगविद्येला अुताच्या वलयाऐवजी वैज्ञानिक बैठक दिली. 'सुदामदेवचरित्र', 'कुवलयानंदांची गाणी' ही त्यांची मराठी पुस्तके, तर 'प्राणायाम' इंग्रजी याज्ञवल्क्य स्मृतीचे संपादनही (१९२९) त्यांनी केले. **२००३:-** कथा, कादंबरीकार आणि मुलांसाठी नाटके लिहिणारे वामन सदाशिव पात्रीकर यांचे निधन. 'सत्यकथा', 'किर्लोस्कर' या मासिकांमधून आणि 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' या दैनिकांतून त्यांचे लिखाण प्रसिध्द. हिंदी भाषेतील 'धर्मयुग' आणि 'कादंबिनी' या नियतकालिकांतही त्यांच्या कथा प्रकाशित. ते अगदी सोपी, छोटी आणि अर्थपूर्ण वाक्ये लिहीत. पात्रीकरांचे 'विश्वातील विश्व' हे पुस्तक त्याकाळचे उाम खपाचे पुस्तक होते.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**निवडक**

## भीमगीतांचा कार्यक्रम

**पनवेल :** विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विचुंबे, देवद, उसर्ली वेलफेअर असोशियनचे अध्यक्ष अविनाश गायकवाड यांच्या तर्फे आयोजित या कार्यक्रमात गायक चंद्रकांत शिंदे आणि मानसी शिंदे यांच्या गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अविनाश गायकवाड यांनी केले आहे.

## सिद्धांत लोखंडे याचे निधन

**कोलाड :** कुणबी समाजोन्नती संघ मुंबई ग्रामीण शाखा तालुका रोहा विभाग कोलाड कुणबी समाजाचे अध्यक्ष संदेश लोखंडे आंबेवाडी यांचा पुत्र सिद्धांत लोखंडे याचे निधन झाले. सिद्धांत यांच्या पश्चात आई, वडील आणि भाऊ असा लोखंडे परिवार असून त्याचे दशक्रिया विधी सोमवारी (दि.२२)श्री क्षेत्र उद्धर रामेश्वर पाली येथे संपन्न होणार आहेत तर उत्तर कार्य तेरावे गुरूवारी (दि.२५) त्यांच्या राहत्या निवासस्थानी मौजे आंबेवाडी येथे संपन्न होणार आहेत.

## अपघातात तरुण जखमी

**पनवेल :** नियमांचे पालन न करता कंटेनर चालवून स्कुटीच्या आरशाला धक्का लागला आणि स्कुटीखाली पडल्याने कमलेश शहाजी मराठे जखमी झाले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. कमलेश मराठे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय, पनवेल त्यानंतर एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे उपचार सुरू आहेत. कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शबरीमाता मूर्ती प्राणप्रतिष्ठा

**वेनगाव :** वेनगाव येथील आदिवासी वाडीत शबरी मातेच्या मूर्ती प्राण प्रतिष्ठेचा सोहळा पार पडला.या सोहळ्याचा कार्यक्रम सलग तीन दिवस पार पडला. सोमवारी सकाळी संपूर्ण गावातून शबरी मातेच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. दुपारी पुण्याहवाचन सायंकाळी जलाधीवास, रात्री जागर भजनाचा कार्यक्रम तर मंगळवारी सकाळी देवता स्थापना, अग्निस्थापना, हवन बलिदान, पूर्णाहुती, अभिषेक करण्यात आले. दुपारी मूर्ती प्रतिष्ठापना रात्री जागर भजन असा सोहळा पार पडला.

## मद्यपींवर कारवाई

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग पनवेलने मद्यपी ग्राहक आणि दारूचा गुत्ता चालविणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या कारवाईत हातभट्टीच्या दारूवर कारवाई करण्यात आली. या प्रकरणी दारुचा सार्वजनिक गुत्ता चालविणाऱ्या दोन इसमाविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६८ व सहा मद्यपी ग्राहकांविरुध्द कलम ८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ एप्रिल

१) श्रीम. वसुंधरा जगन्नाथ महाले
मु.पो. किहीम, अलिबाग
१९-०४-१९४५

२) श्रीम. लता यशवंत बोडस
चेंढरे, अलिबाग
१९-०४-१९४८

३) श्री. अशोक रामचंद्र बाणे
गोंधळपाडा, वेश्वी, अलिबाग
१९-०४-१९४९

४) श्री. जयेन्द्रनाथ घोसाळकर
सारळ, ता. अलिबाग
१९-०४-१९४९

५) श्री. सुभाष रामचंद्र खोत
गोंधळपाडा, वेश्वी, अलिबाग
१९-०४-१९५५

६) श्रीम. शोभा राजेंद्र घोडींदे
ब्राह्मणआळी, अलिबाग
१९-०४-१९५८

# आषाणे ठाकूरवाडीत पाणीटंचाई

## खासगी टँकरने पाणी पुरवठा | स्थानिक ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या आषाणे ठाकूरवाडीमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. येथील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने टँकर सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, सध्या या वाडीमध्ये खासगी टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.**




माथेरान डोंगरातील १२ आदिवासीवाड्यामधील आषाणे ठाकूरवाडी ही उमरोली ग्रामपंचायत मध्ये आहे. मात्र आषाणे ठाकूरवाडी डोंगरावर वसली असल्याने स्थानिक ग्रामस्थांना उन्हाळा सुरू झाला की पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. या वाडीमध्ये ६०० आदिवासी लोकांची वस्ती असून त्यांच्यासाठी असलेल्या दोन्ही विहिरी आटल्या आहेत. त्याबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी उमरोली ग्रामपंचायत कार्यालयात जावून टँकर सुरू करण्याची मागणी केली. याच वाडीमधील रहिवाशी असलेल्या ठमी सांबरी या उमरोली ग्रामपंचायतचे सरपंच आहेत. मात्र आज त्यांच्याच वाडीमध्ये पिण्याचे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे उमरोली ग्रामपंचायत सरपंच ठमीबाई नामदेव सांबरी, मनोहर ठाणगे, तुकाराम हिरू पिरकर, पदु गणू संबरी, प्रकाश पीरकर, सदस्य राजू पिरकर, मंगल लोते, गणपत सांबरी, भाऊ होले, चंद्रकांत पिरकर, महादू पिरकर, वामन पाचंगे, वामन पारधी, विकास निरगुडा यांनी प्रशासनाला पाण्याच्या समस्येबद्दल माहिती दिली.

स्थानिक ग्रामस्थांची पाण्यासाठी सुरू असलेली वणवण थांबावी यासाठी खासगी टँकर सुरू करण्याचा निर्णय मनोहर थोरवे यांनी घेतला. ग्रामस्थांची गैरसोय टाळण्यासाठी तत्काळ कर्जत येथून पाण्याचा टँकर घेवून शरद ठाणगे हे आषाणे ठाकूर वाडीत पोहचले. टँकरमधून आणण्यात आलेले पाणी तेथील विहिरीमध्ये टाकण्यात आले.

## कळंबोलीत चार किलो गांजासह एकाला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली परिसरात एक लाख रुपये किमतीचा चार किलोग्रॅम गांजा अंमली पदार्थासह एकाला पोलीसांनी अटक केली. नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली असून या प्रकरणी आसूडगाव येथे राहत असलेल्या ३४ वर्षीय दिनेश जाधव याला अटक करण्यात आले आहे. पोलीसांना गांजा या अंमलीपदार्थ घेऊन एक व्यक्ती कळंबोली स्टीलबाजाराच्या रस्त्यावर येणार असल्याची माहिती मिळाली होती. कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन कोकरे, पोलीस उपनिरिक्षक मंगेश बाचकर, पोलीस हवालदार रमेश तायडे व इतर पोलीसांनी मंगळवारी रात्री पावणेनऊ वाजता सापळा रचल्यावर तेथे संशयीत तरुण आल्याचे दिसले. संशयीताच्या हातामधील पिशवीची झडती घेतल्यावर त्यामध्ये ४ किलो १०० ग्रॅम वजनाचा गांजा होता.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# मच्छीमारांची मासळी दुष्काळाशी झुंज

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सातत्याने होणारे हवामानातील बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या जलप्रदूषणामुळे दिवसेंदिवस माशांचा साठा कमी होत चालला आहे. कधीकाळी राज्याच्या सागरी जलाधिक्षेत्रात मुबलक मिळणारी मत्स्य संपदा आणि तिच्यावर उपजीविका करणारे लाखो मच्छीमारांना मागील काही वर्षांपासून मासळीच्या दुष्काळाशी झुंजावे लागत आहेत.



सागरी मासेमारीला तर मुळातच अनेक मर्यादा आहेत. त्यातच समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक प्रजातींचे मोठ्या प्रमाणावर मासे मृत्यूमुखी पडत आहेत. तर काही प्रजाती स्थलांतर करीत आहेत. जागतिक तापमान वाढीमुळेही माशांसह समुद्रातील एकंदरीतच जीवसृष्टीवरच अनिष्ट परिणाम होत आहे. अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये झिरो ऑक्सिजन झोन निर्माण झाले आहेत.त्यामुळे अशा भागांतून काही प्रजातींचे मासे इतरत्र स्थलांतरित होत आहेत. घोळ, जिताडा, शेवंड, बोंबील, मांदेली, कर्ली, कोळंबी, पापलेट, सुरमई तसेच खेकडे याचबरोबर इतर अनेक प्रजातींचे समुद्रातील अस्तित्व मागील काही वर्षांपासून कमी झाले आहे. यावर कहर की काय, बेकायदेशीर पर्ससीन, एलईडी मासेमारीचा होणारा अतिरेक याचा मोठा परिणाम पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक उत्पन्नावर झाला असल्याचे मच्छीमारांनी सांगितले. राज्याच्या सागरी हद्दीत घुसखोरी करून कोट्यवधींची मत्स्य संपदा हडप करणाऱ्या कर्नाटक, गुजरात राज्यांतील हायस्पीड ट्रॉलर्सनींही राज्यातील पारंपरिक मच्छीमारांचे जगणे कठीण करून टाकले आहे. समुद्रातील वाढते जलप्रदूषण, अनियंत्रित परराज्यांतील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालाण्याची व अवैध पर्ससीन, एलईडी मासेमारीवरील बंदी केवळ कागदावरच राहिली आहे.मासळीची घटती उत्पादकता आणि नौकांची कमी होणारी संख्या यामुळे मासेमारी व्यवसायावर गंडांतर आले असल्याचे मार्तंड नाखवा यांनी सांगितले.

मागील काही वर्षांपासून मासेमारी व्यवसाय धोक्यात आल्याने तर मासेमारी उद्योगातील नौकांचे प्रमाण कमी होत चालले असल्याचेही समोर आले आहे. मासेमारीसाठी लाखो रुपयांची गुंतवणूक करून खर्च केलेली रक्कमही वसुल होत नसल्याने मच्छीमारांचा मासेमारी नौका विकण्याकडे कल वाढत चालला आहे. तसेच मासेमारीच्या हंगामात अनेक नैसर्गिक संकटांमुळे मासेमारीचे दिवस वाया जात असल्याने त्यांना नाहक आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याच्या मच्छीमारांच्या तक्रारी आहेत.

## वृद्धाला दुचाकीने उडवले

**पनवेल :** चार दिवसांपूर्वी कामोठे वसाहतीमधील पोलीस ठाण्यासमोरील रस्त्यावर भाजीमार्केटशेजारी एका वृद्धाला भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीने उडवून दुचाकीस्वार फरार झाले. अत्यवस्थेमध्ये वृद्ध बेलापूर येथील अपोलो रुग्णालयात उपचार घेत आहेत. कामोठे वसाहतीमधील सेक्टर ८ येथील धारा कॉम्प्लेक्समध्ये राहाणारे ७२ वर्षीय बलविंदर भट्टी हे सकाळी साडेअकरा वाजता भाजी खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडले होते. भट्टी हे पायी चालत असताना त्यांच्या मागून भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने भट्टी यांना ठोकर मारल्यानंतर ते जमिनीवर पडले. भट्टी यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा नोंदविला आहे.

## आरटीई नोंदणीला थंड प्रतिसाद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील खासगी, अनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मागील दोन दिवसांपासून आरटीईच्या २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे; मात्र या नोंदणीला राज्यात अत्यंत कमी प्रतिसाद मिळत आहे.

आरटीई प्रवेशासाठी पालकांचा मोठा कल हा खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतो; मात्र या वेळी अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचाही आरटीई प्रवेश प्रक्रियेत समावेश झाला असल्याने असंख्य पालकांना जवळच्या भागात आपल्याला इंग्रजीच्या खासगी शाळा आणि त्यांची नावे ऑनलाईन नोंदणीत मिळत नसल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या आहेत.

आरटीई प्रवेशासाठी तब्बल नऊ लाख ७६ हजार जागा उपलब्ध असताना मागील दोन दिवसांत या प्रवेशासाठी केवळ सात हजार ३८० पालकांनी आनलाईन अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. पालकांचा ऑनलाईन नोंदणीला प्रतिसाद कमी मिळत असल्याने ही नोंदणी प्रक्रिया पुढील काही महिने सुरू ठेवावी लागेल, अशी शक्यता आहे.

**३० एप्रिलपर्यंत नोंदणी प्रक्रिया**

**आरटीईअंतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकांकरिता विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटर अंतरावरील खासगी शाळेत २५ टक्के आरक्षित कोट्यातून मोफत प्रवेश दिले जाणार असून त्यासाठी https://student.maharashtra.gov.in/adm_portal या पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया सुरू असून ती ३० एप्रिलपर्यंत चालणार आहे.**

## पान १ वरुन

### महायुतीच्या सभेत चोरांचा सुळसुळाट

त्यांची साडेतीन तोळ्याची चेन खेचून घेतली. चेनमधील सोन्याचे लॉकेट मात्र, शर्टमध्येच अडकले. त्यामुळे तटकरेंच्या सभेत चोरांचा सुळसुळाट वाढल्याने सभेत येणाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### तटकरे पराभवाच्या खाईत?

त्यांनी कधीच जातीभेद केला नाही. तटकरेंना कदाचित पराभव दिसत आहे. यासाठी ते सेफ गेम खेळत असावेत. हे जरी खरे असले, तरी रायगड लोकसभा मतदार संघातील जनता तटकरेंना पराभूत केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास इंडिया आघाडीतील नेत्यांनी व्यक्त केला आहे.

### मोदींना सत्तेचा उन्माद- शरद पवार

इतक्या उत्साहाने आले आहेत, तर मतदारसंघात किती जोमाने काम करणार हे तुमच्या उपस्थितीने सगळ्यांना झालं असं शरद पवार म्हणाले आहेत. अनेकदा तुमच्याशी संपर्क साधायची संधी येत्या काही दिवसांत आम्हाला मिळणार आहे, असंही शरद पवार म्हणाले. आज ज्यांच्या हाती सत्ता आहे, त्यांनी दहा वर्षे जनतेची फसवणूक केली. महिलांवरचे अत्याचार, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी या सगळ्यांबाबत दिलेली आश्वासनं आणि वस्तुस्थिती यामध्ये जमीन आस्मानाचा फरक आहे. २०१४ मध्ये मोदी सत्तेत आले. त्याआधी मनमोहन सिंग यांनी सत्ता सोडली. त्यावेळी पेट्रोलचे दर ७१ रुपये लिटर होते. मोदींनी आश्वासन दिलं होतं, ५० दिवसांत पेट्रोलच्या किंमती ५० टक्क्यांनी कमी करतो. आज ३ हजार ६५० दिवस झाले, हे आश्वासन पूर्ण झालेलं नाही. आत्ता पेट्रोलचा दर १०६ रुपये लिटर झाला. असा आरोप शरद पवार यांनी केला. २०१४ मध्ये मोदींनी सांगितलं होतं, गॅसचा दर ४१० रुपये आहे, तो कमी करणार. गॅस सिलिंडरचे दर ११६० रुपये आहेत. म्हणजे जे बोलले, आश्वासन दिलं तशी कृती केली नाही, असंही शरद पवार म्हणाले.

### गीतेंसाठी शरद पवार येणार मोर्ब्यात

घटक पक्षही या निवडणुकीत जोमाने कामाला लागले आहेत. या निवडणुकीतील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मोर्बा येथे होणारी सभा ऐतिहासिक होणार आहे.

मोर्बा येथील शेकापचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत म्हणाले कि, सुनील तटकरेंनी शेकाप कसा संपेल, उमेदवार कसे पडतील, यासाठी प्रयत्न केले. तटकरेंचा बदला घ्यायचा असल्याने इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागा. तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात बोलताना सुरुवातीला आ. जयंत पाटील व उपस्थित कार्यकर्त्यांचे स्वागत करून आपल्या इंडिया आघाडीचे सदाचारी उमेदवार अनंत गिते यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले.

**आता बदला घ्यायचा-** या निवडणुकीत आपल्याला बदला घ्यायचा आहे. त्यासाठी संपूर्ण ताकदीने इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागा. सुनील तटकरे हे विश्वासघातकी आहेत. २०१९ मध्ये आपण त्यांना मदत करून दिल्लीत निवडून पाठवले. परंतु याची जाण त्यांनी न ठेवता त्यांनी २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपला विश्वासघात केला. निवडून आल्यावर शेकाप कार्यकर्त्यांनी सुचविलेली विकासकामे केली नाहीत. आता शिवसेना व शेकाप एकत्र असल्याने जिल्हा परिषद आपली आहे. दिवसेंदिवस मोदींची बाजू कमजोर होत चालली आहे. जनतेत महायुतीच्या विरोधात उद्रेक व संताप आहे. मोर्बा येथे होणारी शरद पवारांची सभा रायगडकरांचे पूर्ण लक्ष वेधणार आहे. यासाठी या सभेला हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याचे आ. जयंत पाटील यांनी सांगितले.

### ‘डिपॉझिट’ जप्त शब्दाची निवडणुकीत रंगत

अधिक. त्यामुळे या रकमेला निवडणुकीत खूप महत्त्व असते. अनेकांकडे कोट्यवधी रुपये असतात, २५ हजार रुपये गेले म्हणून त्यांना फार फरक पडणार नसतो, मात्र डिपॉझिट जप्त ही राजकारणात लाजिरवाणी गोष्ट मानली जाते. त्यामुळे भलेभले निवडणुकीच्या मैदानापासून दूर राहणे पसंत करतात.

# बेशिस्त रिक्षाचालकांचा पनवेल स्थानकात अडसर

## कारवाई करूनही मुजोरी कायम, प्रवाशांचे हाल

**। पनवेल । वार्ताहर ।**

रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश करण्यापूर्वी पायी चालणाऱ्या प्रवाशांची वाट तीन आसनी रिक्षाचालकांनी अडवली आहे. सध्या तीन आसनी रिक्षांना स्थानक परिसरात काम सुरू असल्याने प्रवेशबंदी केल्याने काही रिक्षाचालकांनी पादचाऱ्यांची वाट अडवून पोलिसांच्या कारवाईला ठेंगा दाखविला आहे. वाहतूक पोलिसांना याबाबत विचारल्यावर त्यांनी बेशिस्त चालकांवर कारवाई सुरू असल्याची माहिती दिली.



पनवेल स्थानक परिसरात बहुउद्देशीय मार्गिकेच्या विस्तारीकरणाचे काम असल्याने स्थानकात रेल्वे पकडण्यासाठी वृद्ध, बालक व अपंगांना स्थानक गाठण्यासाठी दिव्य पार करावे लागते. सुमारे काही मीटर अंतर हातामध्ये ओझे घेऊन चालणाऱ्या प्रवाशांना स्थानकाकडे जाणाऱ्या वाटेत रिक्षांना वळसा घालून जावे लागते. काही रिक्षाचालक त्यांची वाहने बेकायदा पद्धतीने स्थानकापर्यंत घालतात. सामान्य प्रवासी मात्र वाट काढत स्थानकापर्यंत जातो.

दीड महिन्यापूर्वी रिक्षाचालकांच्या दोन गटांतील हाणामारीमुळे पनवेल रेल्वे प्रशासनाने रेल्वेच्या विस्तारीकरणाचे काम पुढे करत रिक्षांना स्थानक परिसरातील स्टॅण्डपर्यंत येण्यास बंदी केली. मात्र रिक्षांना प्रवेश नाही तर सर्वसामान्यांच्या वाहनांना स्थानक परिसरातील रस्ता बंद करण्याची वेळ आली. बेशिस्त पार्किंग व्यवस्था, रेल्वे प्रशासनाचा अनियोजित कारभार आणि रेल्वे तसेच वाहतूक पोलिसांची सातत्याची कारवाई नसल्याने या असरन्वयाच्या कारभारात सामान्य प्रवासी भरडले जात आहेत.

> **पनवेलमधील रिक्षाचालकांनी शिस्त पाळून व्यवसाय करावा यासाठी वेळोवेळी रिक्षाचालकांचे प्रबोधन केले आहे. वेळीच त्यांच्यावर कारवाई केली आहे. पोलिसांची कारवाई या परिसरात सातत्याने सुरू असते. रात्रीच्या व पहाटेच्या वेळी रिक्षाचालक रस्ता अडवून रिक्षा उभी करत असल्यास पोलीस कर्मचारी बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई नक्की करतील.**
>
> **-संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल वाहतूक विभाग**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.नितेन विश्वंभर लालपुरिया रा. विलेपार्ले ईस्ट, मुंबई - ४०००५७ यांनी मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आर्यन राहुल बनसोडे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ५९ | १ क | ०.२०.०० | ०.२५ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत दयावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**


# रस्ते चकाचक,वाहने सुसाट



**। कोर्लई । वार्ताहर ।**

नुकतेच साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्यावरील डांबरीकरण काम प्रगतीपथावर असून बहुतांशी रस्ता चकाचक झाल्याने रस्त्यावर वाहनाचा वेग वाढला असून पादचारी, प्रवासी वर्गाची डोकेदुखी ठरत असून मुरुड तालुक्यातील मजगांव स्थानकादरम्यान अपघाताची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेऊन या ठिकाणी गतीरोधक बसविण्यात यावेत. अशी मागणी जोर धरत आहे.

पर्यटनात मुरुड जंजिरा, काशिद बीचवर मौजमजा मस्ती, आनंद लुटण्यासाठी शनिवार रविवार व सुट्टीच्या दिवशी याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची रेलचेल असून या रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात तसेच काही वेळा वाहतूक कोंडीलादेखील सामोरे जावे लागते. त्यातच आता रस्ता चकाचक झाल्याने वाहने सुसाट वेगाने जात असून अपघाताची भिती वाढल्याचे भिती व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष देऊन मजगांव स्थानकादरम्यान गतीरोधक बसविण्यात यावेत.अशी मागणी जोर धरत आहे.


### लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
### ३२- रायगड लोकसभा मतदारसंघ

मा. भारत निवडणूक आयोगाने ३२-रायगड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण), निवडणूक निरीक्षक (पोलीस) आणि निवडणूक निरीक्षक (खर्च) म्हणून खालील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

| अ.क्र. | निवडणूक निरीक्षक | नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | नागरिक/मतदार भेटण्याचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण | श्री. संजीवकुमार झा | ९६९९९७६८११ | शासकीय विश्रामगृह अलिबाग | दु.१२.०० ते १.०० |
| २ | पोलीस | श्रीम.जोयस लालरेमव्वी | ९०२२७४२२४० | शासकीय विश्रामगृह अलिबाग | दु. १२.०० ते १.०० |
| ३ | खर्च | श्री. धीरेंद्रमणी त्रिपाठी | ९३७३३६४५३२ | शासकीय विश्रामगृह अलिबाग | दु. १२.०० ते १.०० |

**किशन ना. जावळे**
**जिल्हा निवडणूक अधिकारी**
**रायगड**

**निवडक**

## सुक्या लाकडांचा आधार

**पाताळगंगा :** घरखर्चाचे नियोजन करताना गृहिणींना तारेवरची कसरत करावी लागत आहे. गॅस महागल्याने अनेक महिलांचा कल चुलीकडे वळला आहे. त्यामुळे चुलीसाठी लागणाऱ्या सरपणाची ग्रामीण भागात मागणी वाढली आहे. शिवाय घरखर्च कमी होण्यासाठी या परिसरात अनेक घरांमध्ये चुलींवर स्वयंपाक होताना दिसत आहे. या गृहिणींना सरपण पुरवण्यासाठी लाकडाची मोळी विकणाऱ्या आदिवासी महिला खालापुर तालुक्याच्या परिसरात दिसत असून हेच त्यांच्या रोजगाराचे साधन बनले आहे.

## आदिवासी समाजाचा मेळावा

**गोवे-कोलाड :** फाउंडेशनच्यावतीने रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधवांचा भव्य मेळावा सुकेळी येथे घेण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. या मेळाव्यानिमित्ताने आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रम व नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या नृत्य स्पर्धेत आदिवासी बांधवांकडून आदिवासी समाजातील पारंपारिक नृत्य सादर करण्यात आले. यावेळी लहान मुलांसह तरुणांनी विविध पारंपारिक नृत्य सादर केले.

## रायगडवर भटकंती

**पाली/गोमाशी :** वेध सह्याद्री ही संस्था गडकिल्ले संरक्षण, संवर्धन, जतन, स्वच्छता मोहीम असे उपक्रम गेले कित्येक वर्षे राबवित आहेत. ज्या मुलांच्या आयुष्यात अनेक संकट आहेत, शैक्षणिक परिस्थिती, आर्थिक परिस्थितीमुळे ज्यांना आपल्या आयुष्यात अनेक अडचणी आहेत, अशा आदिवासी मुलांच्या मनात उत्तुंग अशी सकारात्मक ऊर्जा यावी, शिवछत्रपतींच्या इतिहासातून प्रेरणा घेता यावी म्हणून वेध सह्याद्री मार्फत आदिवासी आश्रम शाळेतील मुलांना विनामूल्य दुर्गदुर्गेश्वर रायगड दर्शनासाठी नेण्यात आले.

## सर्वेक्षण पथक सज्ज

**सुधागड :** सुधागड तालुक्यात लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज करण्यात आले आहेत. तालुक्यातील २१ गणपती व गोंदाव फाटा या ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज आहेत. सध्या राज्यात लोकसभेची रणधुमाळी चालू असताना निवडणुकीत कुठलाही गैरप्रकार होऊ नये या अनुषंगाने सहाय्यक निवडणूक अधिकारी पेण १९१ मतदार संघ ३२ रायगड यांच्या अधिपत्याखाली सुधागड तालुक्यात बाहेरून प्रवेश करणाऱ्या सीमेवर अवैध दारू, अवैधरित्या पैसे, त्याचप्रमाणे अवैध शस्त्रसाठा येण्याची निवडणुकीमध्ये दाट शक्यता आहे.

## उष्माघातापासून बचाव करा

**पनवेल :** उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे. अशावेळी उष्माघात होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक असल्याचे आवाहन आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी केले आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराचे तापमान वाढून उष्माघात होण्याची शक्यता असते. राज्य शासनाकडील आपत्ती व्यवस्थापनाने देखील उष्माघाताच्या अनुषंगाने आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने घेऊन जावे.

# उष्णतेच्या लाटेमुळे उरणकरांचा जीव मेटाकुटीला

**। उरण । वार्ताहर ।**

एप्रिलमध्ये आलेल्या उष्णतेच्या लाटेने उरणकरांचा जीव मेटाकुटीला आला आहे. बदलते हवामान आणि आलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे उरण सर्वाधिक तापमानाचे ठिकाण ठरत आहे. मागील दोन दिवसांपासून उष्णतेच्या लाटेमुळे येथील नागरिक हैराण आहेत. तसेच, विजेचा लोड वाढल्याने रात्रीच्या वेळेत सतत वीजपुरवठा खंडित होत होता. तर, दुसरीकडे हवामान बदलामुळे रुग्णांची संख्यादेखील वाढण्याची शक्यता आहे.

उष्णतेच्या लाटेमुळे उरणचे तापमान जवळपास ४३ अंश सेल्सिअसवर जात आहे; मात्र, अचानक आलेल्या या उष्णतेच्या लाटेचा उरणकरांना चांगलाच त्रास सोसावा लागत आहे. मंगळवारी सर्वाधिक तापमान वाढल्याने घरातील पंखे, एसी, कुलर मोठ्या प्रमाणात वापरात आले. त्यामुळे विजेवर ताण पडल्याने रात्रीच्या वेळेत दर तासाला विजेचा खेळखंडोबा सुरू होता. त्यामुळे उरणकरांना रात्र जागून काढावी लागली.



दुसरीकडे वाढलेल्या तापमानाचा फटका नागरिकांच्या आरोग्याला बसत आहे.

उष्णतेमुळे गेल्या दोन दिवसांत रुग्णसंख्या वाढताना दिसत आहे. यात उलट्या, जुलाब, डोकेदुखी, ताप, रक्तदाब कमी होणे यांसारखे त्रास जाणवणारे रुग्ण गेल्या दोन दिवसांत वाढताना दिसत आहेत. त्यात आता अजून दोन ते तीन दिवस उष्णतेच्या झळा बसणार आहे. तसेच, मान्सून सुरू होईपर्यंत साधारण तापमान हे ३७ ते ३८ अंश सेल्सिअसवरच कायम राहणार आहे. त्यामुळे उष्णतेचा त्रास टाळायचा असेल; तर साधारण दुपारच्या १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, सतत पाणी प्यावे, उष्ण व तळलेले पदार्थ खाणे टाळावे असे उरण डॉक्टर वेल्फेअर असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ. सत्या ठाकरे यांनी सांगितले.

> **अचानक तापमानाच्या वाढीचा फटका हा नागरिकांच्या आरोग्यावर झाला आहे. शहरातील तापमान ४३ अंश सेल्सिअसवर गेल्याने अनेकांना उष्माघातासारखा त्रास जाणवायला सुरुवात झाली. त्यामुळे मागील तीन ते चार दिवसांपासूनच शहरात ताप, सर्दी, खोकला, उलटी, जुलाब, पोटदुखी यांसारखे त्रास होणारे रुग्ण वाढताना दिसत आहेत. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी संतुलित राखण्यासाठी पाणी प्यावे. पाणीयुक्त फळे, ताक, लस्सी, बर्फ न टाकता साधा उसाचा रस, नारळपाणी यांसारखे पेय पीत राहण्याची गरज आहे.**
> **– डॉ. सत्या ठाकरे, सेक्रेटरी, उरण डॉक्टर वेल्फेअर असोसिएशन**



# माथेराननने गाठले उच्चांकी तापमान

**। माथेरान । वार्ताहर ।**

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेराननने मंगळवारी (दि.१६) उच्चांकी तापमान गाठले असून अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच चाळिशीपर्यंत तापमान गेल्याने येथील पर्यटनाबाबतच चिंता निर्माण झाली आहे. थंड हवेच्या ठिकाणी जर इतके तापमान असेल तर येथे येणाऱ्या पर्यटकांचा ओढा आपसूकच कमी होणार. त्यामुळे माथेरानच्या पर्यटनासाठी ही धोक्याची घंटा आहे. दुपारनंतर येथील वातावरणामध्ये कमालीचा बदल घडत असून ढगाळ वातावरणामुळे गर्मी वाढत असल्याचे चित्र आहे. संध्याकाळच्या वेळी मात्र थंड हवा सुटल्याने नागरिकांना दिलासा मिळत असतो. परंतु, आगामी काळामध्ये ही वाढत जाणारी गर्मी पर्यटन स्थळासाठी धोक्याची घंटा असल्याने आतापासूनच माथेरान वाचवण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. माथेरान मधील स्थानिकांना इतक्या गर्मीची सवय नसल्याने आजाराचे प्रमाण वाढत असून गर्मीपासून बचावारिता नागरीक दिवसा घराबाहेर पडत नसल्याने येथील बाजारपेठेत शुकशुकाट पाहावयास मिळत आहे.

# उष्णतेची लहर त्यात डासांचा कहर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उष्णतेमुळे अंगाची काहीली होत असतानाच नागरिकांना आता डासांचाही सामना करावा लागत आहेत. त्यात रात्रीच्या सुमारास वारंवार वीज पुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांच्या त्रासात आणखीनच भर पडत आहे.

यंदा उष्णतेच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे थंडाव्यासाठी एसी, पंख्यांचा वापर वाढला असून विजेच्या मागणीत वाढ झाली आहे. परिणामी अनेक ठिकाणच्या विजवाहिन्यांवर अतिरिक्त ताण पडून विजवाहिन्या खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. उष्णतेपासून सुटकेसाठी अनेक नागरिक दरवाजे खिडक्या उघड्या ठेऊन वामकुक्षी घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

मात्र, अचानक डासांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे उघड्या असलेल्या खिडक्या दरवाज्यांमधून डास घरात घुसत नागरिकांचे चावे घेत आहेत. डासांच्या चाव्यामुळे झोप मोड होत असल्याने कळंबोली कामोठे वसाहतीमधील नागरिक संध्या हैराण आहेत. दरवर्षी उन्हाळा सुरु होताच मच्छरांच्या त्रासात देखील वाढ होते. तसेच, डासांच्या चाव्यामुळे होणाऱ्या आजारात देखील वाढ होत असल्याने नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून केले जात आहे.

# श्रीवर्धन-म्हसळा तापले!

**। कापोली । वार्ताहर ।**

श्रीवर्धन -म्हसळा तालुक्यातील नागरिक सुर्य आग ओकत असल्याने अक्षरशः उष्णतेमुळे हैराण झाले आहेत. अंगाची लाहीलाही होत आहे. ऐन उन्हाळ्यातही कधी उष्ण, तर कधी दमट वातावरण निर्माण होत आहे. मध्येच अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा प्रचंड नुकसान होत असतो. वाढत्या उष्णतेमुळे काम धंद्याच्या शोधात लोकं घराबाहेर पडताना काळजी घेत आहेत. अश्यातच कोकणातील जे शेतकरी शेतात भाजीपाल्याचे उत्पादन घेत आहेत, त्यांना उन्हाचा प्रचंड त्रास होऊ लागला आहे. अक्षरशः त्यांचे शरीर शेतात गारवा असुनही भाजून निघत आहे. बॉटलम धील पाण्याची मागणी वाढू लागली आहे. शरीराला गारवा मिळावा म्हणून नारळ पाणी, उसाचे रस, लिंबू सरबत, कोकम सरबत रस्त्यात जिथे दुकान असतील तिथे थांबून गर्दी करु लागले आहेत.

## अध्यक्षपदी चाळके यांची निवड

**। अलिबाग । वार्ताहर ।**

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग या संस्थेच्या नवीन अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड मंगळवारी (दि.१६) संस्थेच्या डॉ. हेडगेवार सभागृहात अध्यासी अधिकारी श्रीकांत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आली. संस्थेचे पुर्वाश्रमीचे अध्यक्ष सतीशचंद्र पाटील यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी ही निवडणूक घेण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार चाळके व सचिवा गीतांजली ओक यांनीही उपाध्यक्षपदाचा तसेच सचिवपदाचा राजीनामा दिला होता. त्या पदाचीही निवडणूक घेण्यात आली. त्यानुसार संस्थेचे अध्यक्ष म्हणून नंदकुमार महादेव चाळके यांची तसेच उपाध्यक्ष म्हणून मोरेश्वर दातार यांची एकमताने निवड करण्यात आली. उपविधीच्या तरतुदीनुसार रिक्त सचिवपदी व्यवस्थापनाने एकमताने लक्ष्मण जुंधारे यांची नियुक्ती करण्यात आली.

# माथेरान घाटात मिनी बस बंद; प्रवाशांकडून संताप

**। कर्जत । वार्ताहर ।**

जागतिक पर्यटन स्थळ असलेले ठिकाण म्हणजे माथेरान. या माथेरानमध्ये जाण्यासाठी निघालेली मिनी बस घाटात बंद पडल्याने ऐन उन्हाळ्यात प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

गुरूवारी (दि.१८) कर्जतहून सकाळी सव्वाआठच्या सुमारास ४० प्रवाशांना घेऊन निघालेली मिनी बस जम्मापट्टीजवळ तीव्र चढाव असल्याने गरम होऊन घाटात बंद पडली. त्यामुळे बसमधून नेहमी प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे. पर्याय म्हणून दुसरी बस मागवण्यात आली, पण प्रवाश्यांनी थांबून न राहता मिळेल त्या वाहनाने माथेरान गाठले. तर, प्रवाशांचे तिकीटाचे पैसे परत न दिल्यामुळे संताप व्यक्त करण्यात आला.

सध्या नेरळ माथेरान घाटात सुरू असलेल्या बस जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे प्रवांशाची सुरक्षा रामभरोसे आहे. एखादा मोठा अपघात झाल्यास याला



जबाबदार कोण, असाही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

काही दिवासांपुर्वी माथेरान घाटात नवीन बसची चाचणी घेण्यात आली. परंतु, ती आकाराने मोठी असल्याने घाटातील वळणावर अडचण येऊ लागली. त्यांनंतर नवीन बस देण्यात येतील, अशी घोषणा आ. महेंद्र थोरवे यांनी केली होती. पण, अद्याप बस माथेरानला येऊ शकली नाही. त्यामुळे जुन्याच बसमधून जिव मुठीत घेऊन नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. माथेरानच्या माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत या सातत्याने शासन दरबारी नवीन मिनीबस करता पाठपुरावा करत आहेत, परंतु त्यांच्याही प्रयत्नांना यक्ष आले नाही.

# मढाळी बु. येथे पूर्व तयारी मेळावा

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील मढाळी बु. येथे सोमवारी ६ वर्ष पूर्ण झालेल्या दाखलपात्र विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश करून शाळा पूर्व तयारी मेळावा मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. शाळेविषयी असलेली मनातील भीती कमी व्हावी, त्यांचे शैक्षणिक भविष्य सुखकर व आंनदायी जाण्यासाठी शाळेत प्रवेशोसत्व कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शाळेत प्रवेश घेणाऱ्या नवीन चिमुकल्यांचे बँड पथक वाजवून स्वागत करण्यात आले. तसेच, या लहानग्यांना त्यांचे हात धरून बोलून शाळेत पहिले पाऊल टाकून व औक्षण करून त्याचे शाळेत प्रवेश करून घेतले.

# कालनिर्णय आयोजित पाकनिर्णय स्पर्धा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दरवर्षीप्रमाणे यंदाही कालनिर्णय तर्फे वाचकांसाठी पाकनिर्णय २०२५ ही पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी तंदूर/ग्रिल्ड पदार्थ, धिरडी/थालीपीठ/डोसा, केक, नट्स आणि सीड्स वापरून बनवलेले पदार्थ असे चार विभाग ठरवण्यात आले असून सहभागी होउ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या पाककृती याच विभागांतर्गत पाठवणे आवश्यक आहे.

प्रत्येक स्पर्धक जास्तीत जास्त दोन विभागांसाठी आपली पाककृती पाठवू शकतो. स्पर्धकांनी आपली पाककृती आणि पाककृतीचा स्पष्ट फोटो paknirnay@kalnirnay.com या ईमेलवर किंवा पोस्ट/कुरियरने 'पाकनिर्णय स्पर्धा-२०२५, सुमंगल प्रेस प्रा.लि., १७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, एम.एम.जी.एस.मार्ग, दादर (पू.), मुंबई-४०००१४' या पत्यावर पाठवावा. तसेच, पाककृती www.kalnirnay.com/paknirnay या लिंकवर अपलोड करु शकता. प्रथम आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक त्यानंतर पदार्थाचे नाव, साहित्य आणि कृती याच क्रमाने पाककृती लिहून पाठवायची आहे. पाककृती पाठवण्याची अंतिम तारीख ३१ मे आहे. तसेच, प्रत्येक विभागातून तीन विजेते निवडण्यात येतील.



रमजान ईद निमित्त रेवदंडा येथील नभीया असिफ मुकादम वय वर्ष ७ हिने रोजे पूर्ण केल्याने तिचे विशेष कौतुक होत आहे.



# विनापरवाना व्यवसायिकांवर कारवाईची मागणी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड समुद्रकिनाऱ्याजवळील अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर लवकरात लवकर कारवाई करा अन्यथा आमरण उपोषणाला बसू, असा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्यावतीने मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना रितसर निवेदनाद्वारे देण्यात आले.

निवेदनात असे म्हटले की, अनधिकृत व्यवसाय करणारे बिंधास्त पणे शासनाची फसवणूक करुन, महसूल बुडवून, रस्त्याच्या दोन्ही बाजूला विनापरवाना व्यवसाय करीत आहेत. याुळे स्थानिकांना व पर्यटकांना रहदारीस अडथळा निर्माण होतो. यामुळे ठिकाणी मोठा अनर्थ घडु नये याकरिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्यावतीने अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती कारवाई करावी. या करिता मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात अनेक पत्रव्यवहार केले. परंतु, यावर अजुन सुध्दा अनधिकृत व्यवसायधारकांवरती नगरपरिषदेमार्फत कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.

# नागोठणे बसस्थानकाची पाहणी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

राज्यशासनाने १ मे २०२३ या दिवशी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांचा कायापालट करण्याच्या उद्देशाने ङ्गहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक अभियानफ राबवण्याची घोषणा केली होती. राज्यात सर्वत्र हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. याच राज्यशासनाच्या स्तुत्य उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिवहन मंडळांच्या रोहा आगारा अंतर्गत येणाऱ्या रोहा व नागोठणे बस स्थानकांची राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागातून आलेल्या बस स्थानक मुल्यांकन समितीकडून मंगळवारी (दि.१६) पाहणी करून आढावा घेत मुल्यांकन करण्यात आले.



दरम्यान, प्रवाशांचे हित लक्षात घेऊन बसस्थानकांच्या स्वच्छतेचे परीक्षण तटस्थपणे करुन त्याचा अहवाल मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांना सादर केला जाणार आहे.

## रसायनीत कार्यक्रम

**रसायनी :** श्रीराम आचरणाने जीवन न्हाऊन निघते, एक व्यक्ती म्हणून राम एका आदर्श व्यक्तीची वैशिष्ट्ये प्रकट करतात. त्यांच्यामध्ये सर्व वांछनीय सद्गुण होते जे कोणत्याही व्यक्तीला हवे असतात, त्यामुळे तो त्याच्या सर्व नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण करतो, असे उद्गार प्रवीण फराट यांनी काढले.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। सोगांव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील कुंट्याची गोठी-वढाव खुर्द राजिप प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते प्रतिक खारकर यांनी स्वखर्चाने मोफत शैक्षणिक साहित्य वाटप केले.



सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे बामणगाव येथील प्रतिक खारकर यांनी मराठी शाळेला वेळोवेळी अनेक प्रकारची मदत केली आहे. मुलांसाठी सामाजिक बांधिलकी म्हणून व उन्हाळी सुट्टी आनंदात जावी यासाठी चित्रकलेचे साहित्य वह्या, पेन, पेन्सिल, कलरबॉक्स आदी शालेय शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप केले. याप्रसंगी जि.प.मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७
- गाळा भाड्याने देणे आहे. साबू हॉस्पिटल बिल्डींग पी.एन.पी.मध्ये गाळा नं.१६ कलावती भाजी भंडारच्या बाजूला contact No. 7304852315/9604138826
- हॉस्पिटलमध्ये कामासाठी अनुभवी स्टाफची आवश्यकता आहे. नर्स (ANM/GNM) वॉर्डबॉय, मावशी) अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. मो. ९३२१३०३९३८, ९११९५६५०२२, ७७४५०५००२५
- अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३
- वडापाव स्टॉलवर कामासाठी कारागीर पाहिजे. ७०६६१३८३६८
- पर्यटन व्यवसायासाठी कॉटेज किंवा इतर मालमत्ता पाहिजे. ७०६६१३८३६८
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी (हेल्पर) गरजू मुलांची गरज आहे. ९२७०६१४०७७ (चेंढरे-गोंधळपाडा)
- न्यू पनवेल सुकापुर, महाराष्ट्र ग्रामीण बँक जवळ 1BHK पहिला मजल्यावरील फ्लॅट विकणे आहे! ८०८०५५१३२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# ग्राहकांना महावितरणचा शॉक

## सुरक्षा ठेवीच्या नावावर अतिरिक्त देयक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**वाढत्या उष्णतेमुळे विजेचा वापर वाढला आहे. त्यातच विजेच्या दरातदेखील वाढ करण्याचा निर्णय महावीतरण विभागाकडून घेण्यात आल्याने देयकाच्या रकमेत वाढ झाली आहे. महावितरण विभागाने एप्रिल महिन्यात पाठवलेल्या देयकासोबतअतिरिक्तसुरक्षाठेवीची देयक देखील पाठवत विद्युत ग्राहकांना अजून एक जोरदार धक्का दिला आहे.**



महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व वीजग्राहकांना सुरक्षा ठेव जमा करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्षांतील एका महिन्याच्या सरासरी इतके बिल सुरक्षा ठेव म्हणून ग्राहकाला महावितरणाकडे जमा करावे लागते. वीजग्राहकांनी यापूर्वी मूळ सुरक्षा ठेव जमा केली असली तरी वाढलेला वीजदर, वीजवापर लक्षात घेता वीजबिलांमध्ये वाढ झाली आहे. मूळ सुरक्षा ठेव गेल्या आर्थिक वर्षांतील एका महिन्याचे सरासरी वीजबिल, यातील फरकाच्या रकमेचे अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल ग्राहकांना देण्यात आले असल्याची माहिती महावितरणच्या जनसंपर्क विभागाने दिली. वीजग्राहकांनी दिलेल्या सुरक्षा ठेवीवर कालावधीनुसार ९.५ टक्क्यांपर्यंत व्याज देण्याचे राज्य वीज नियामक आयोगाचे निर्देश आहेत. त्यानुसार दरवर्षी मार्च महिन्यांच्या वीजबिलांमध्ये ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याजाची रक्कम समायोजित केली जाते. पनवेल विभागात ४ लाख ५० हजार ग्राहक असून, सर्वांना सुरक्षा ठेव देयक पाठवण्यात आले.

> सर्वसामान्य नागरिक सध्या वाढत्या महागाईने त्रस्त आहेत. त्यातच महावितरण विभागाकडून वाढीव देयकासोबत सुरक्षा ठेवीच्या नावावर अव्वाच्या सव्वा रकमेची देयक पाठवण्यात आल्याने, सर्व सामान्य ग्राहकाने कुठे दाद मागावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.
> - हेमंत जगताप, वीज ग्राहक

### अतिरिक्त देयक आताच का?

**पेट्रोल, डिझेल दर वाढ तसेच घरगुती गॅस दरात झालेल्या भाव वाढीचा फटका सध्या सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. यामुळे नागरिकांचे कंबरडे मोडलेले आहे. त्यातच असह्य उकाड्याने त्रस्त ग्राहकांकडून विजेचा वापर वाढला आहे. परिणामी महावितरणकडुन ग्राहकांना दर महिन्यापेक्षा जादाची देयक पाठवण्यात आली आहेत. आता त्यात सुरक्षा ठेवीच्या नावावर पाठवण्यात आलेल्या देयकाची भर पडल्याने वीज ग्राहकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.**

# घरच्यांना विसरु नका : दाभाडकर

**। पेण। प्रतिनिधी ।**

पुरस्कार मिळणे आणि पुरस्कार देणे या दोन्ही बाबी खूप महत्त्वाच्या आहेत. पुरस्कार देणारा का पुरस्कार देतो आणि पुरस्कार घेणारा तो पुरस्कार का घेतो. परंतु, हे कार्य करत असताना त्याला त्याच्या कुटुंबियांची साथ असणे गरजेचे असते. ती साथ असल्यानेच तो इतरांपेक्षा वेगळे कार्य करु शकतो. म्हणूनच ज्या घरच्यांनी आपल्याला पाठिंबा दिला असतो, त्यांना कधीच विसराचे नसते, असे प्रतिपादन बालरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांनी केले. बापूसाहेब नेने फाऊंडेशन व सोबती संघटना पेणमार्फत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

बापूसाहेब नेने फाऊंडेशन व सोबती संघटना पेणमार्फत ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी बापूसाहेब नेने फाऊंडेशनतर्फे पाच शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार दिला जातो. तर सोबती संघटनेमार्फत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पाच मान्यवरांनादेखील सोबती आदर्श व्यक्तिमत्त्व पुरस्कार देऊन सन्मान केले जाते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी बालरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर दाभाडकर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक बापू साहेब यांनी सोबती संघटनेचे कार्य पुढे नेण्यासाठी सढळ हातांनी सर्वांनी मदत करावी आणि ती मदत आत्तापर्यंत करत आलात ती मदत अशीच पुढे करण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोबती संघटनेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी केले तर पाहुण्यांची ओळख डॉ. निती कदम यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती राजे आणि संयुक्ता टेमघरे यांनी, तर आभार प्रदर्शन निलेश म्हात्रे यांनी केले. यावर्षी सोबतीमार्फत सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महेंद्र ठाकूर, कला क्षेत्र राजा आत्रे, क्रीडा क्षेत्र मयुरा अंगत, शैक्षणिक क्षेत्र प्रकाश गुरव, धाडस विशेष पुरस्कार सर्प मित्र योगेंद्र विरकर, तर बापूसाहेब नेने फाऊंडेशनतर्फे आदर्श शिक्षक म्हणून महेंद्र पाटील, प्रतिभा समेळ, गजानन पाटील, अमित विचारे, विनोद दामोदर म्हात्रे आदींचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक बापूसाहेब नेने व ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने, बापू आठवले, उद्योजक राजू पिचीका, प्रा. पोरे उपस्थित होते.

# 'निवडणूक प्रक्रियेचं पावित्र्य राखा'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ईव्हीएमवरून केलेल्या मतदारांचे क्रॉस व्हेरिकेशन व्हीव्हीपीएटीच्या स्लिपवरून करण्याच्या मागणीच्या याचिकेवर गुरुवारी (दि.१८) न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. निवडणूक प्रक्रियेचं पावित्र्य राखा, असं म्हणत सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला फटकारलं आहे. तसेच, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन्ससह व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल स्लिप्सच्या क्रॉस व्हेरिफिकेशनची तपशीलवार माहिती द्या, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

ईव्हीएमवरून केलेल्या मतदारांचं क्रॉस व्हेरिकेशन व्हीव्हीपीएटीच्या स्लिपवरून करण्याच्या मागणीच्या याचिकेवर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ही एक स्वतंत्र मत पडताळणी प्रणाली आहे. जी मतदाराला त्याचे मत बरोबर टाकले आहे की नाही, याची माहिती देते.

याचिकाकर्त्याचे वकील निजाम पाशा युक्तीवाद करताना म्हणाले, मतदान केल्यानंतर मतदाराला स्लिप मिळाली पाहिजे.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सतर्फे बाजू मांडणारे अधिवक्ता प्रशांत भूषण म्हणाले की, मशीनची काच, जी सध्या काळी आहे, ती पारदर्शक असावी. मतदाराला मतदान केल्यानंतर व्हीव्हीपीएटी स्लिप बॉक्समध्ये जाताना दिसेल, यासाठी प्रकाश बराच काळ चालू असावा, असे प्रशांत भूषण म्हणाले.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील दिनकर मधुकर बदे, रा. घर क्र. १४२५, चिंचआळी, मु. पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत तिचे मालक जयप्रकाश महादेव कवाडकर, रा. कुंभार आळी, मु. पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे- नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| जयप्रकाश महादेव कवाडकर | ४०९ | ३५ | २.९०.२० | २९-०२ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १९ एप्रिल २०२४

**अधिवक्ता अश्विनी एकनाथ धुळे**
**बी. ए. एलएल.बी.**
एन्रोलमेंट क्रमांक (एमएएच ९१०८/२०१९)
रा. वंजारपाडा, पो. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी : ८९८३३३७४२५ dhuleashwini30@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-तिवरे, तालुका- कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| जोत्स्ना हिरालाल म्हात्रे | ४८ | ३ | ०-७०-८० | १४-०५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १९/०४/२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो.९५९५२११८६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) राहूल प्रविणभाई पटेल २) सुनिल कांतीलाल पटेल यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४३ | २ | ०-१५-०० | ०-३९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१९/०४/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि, मौजे कोळगाव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रभाकर रघुनाथ भगत २) श्रीमती. सरिता रघुनाथ भगत (लग्नानंतरचे नाव सरिता प्रकाश म्हात्रे) ३) श्रीमती. संगीता रघुनाथ भगत (लग्नानंतरचे नाव संगीता शांताराम म्हात्रे) ४) श्रीमती. रसिका रघुनाथ भगत (लग्नानंतरचे नाव - सुनिता सुनील म्हात्रे) ५) श्रीमती. रोहिणी रघुनाथ भगत (लग्नानंतरचे नाव - रोहिणी मोहन पाटील) ६) श्रीमती. प्रेमा अरुण म्हात्रे ७) श्रीमती. पुष्पा जनार्दन पाटील यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|
| कोळगाव ता. अलिबाग जि. रायगड | ४३० | ०-०८-९० पो.ख ०-००-२० एकूण ०-०९-१० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही, अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक १९/०४/२०२४

**ॲड. आशिष संदीप रानडे**
रा. रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो. नंबर - ९२७०२९४५४५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-देऊळवाडी, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| निवृत्ती राम उर्फ रामचंद्र थोरवे वै. | ७२ | १/क | एकूण क्षेत्र ०-४७-८० त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-३८-२४ | ७-०० |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १९/०४/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. शरद जगन्नाथ वैती यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे अरवंद, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १७/४/ब एकुण ०.१६.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक १९/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव, ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महाजने ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक किशोर दत्तात्रेय खोत, स्वाती सुनिल खोत, शुभम सुनिल खोत, अनिल दत्तात्रेय खोत सर्व रा. मु, मेटपाडा कोळीवाडा, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती व गवतपड मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| महाजने ता. अलिबाग जि. रायगड | १९४ | ०-७९-९० पो.ख. ०-१७-२० एकुण क्षेत्र ०-९७-२० | ११.८१ |

वर नमुद मिळकतीपैकी किशोर दत्तात्रेय खोत वगैरे ३ यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा वहिवाटीतील उत्तर दिशेकडील ०-५६-१० हे. आर. मिळकत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-
१८/०४/२०२४

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालया समोर गाळा क्र. ३,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-किकवी, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ज्योती शांताराम भालेकर | ९४ | २/क | एकूण क्षेत्र १-००-०० त्यापैकी लिहून देणार यांचे हिश्यापैकी विक्री केलेल क्षेत्र ०-५०-०० हे.आर.पॉ | ०-५९ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १९/०४/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

# हातभट्टीवर कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी तालुक्यातील मानघर येथील हातभट्टीवर धडक कारवाई केली आहे. येथील मिक्सर प्लॅन्टच्या पुढे नदीच्या बाजूला एका इसमाने हातभट्टी लावल्याची माहिती पोलिसांना मिळाली. छापा टाकून त्या ठिकाणी असलेले पत्र्याचे डबे, दारूचा गुळ, नवसागर मिश्रीत द्रव्य ,फ्लॅस्टिक चे बॅरल व इतर साहित्य हस्तगत केले आहे. याप्रकरणी एका इसमाविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

### Public notice

Notice is hereby given to the Public that the document bearing original sale deed in respect of the description mentioned has been misplaced and not traceable. The report of the same has been lodged at the Poynad Police Station on 17/04/2024 vide report no.70/2024

All person is hereby informed not to deal or carry out any transaction with anyone on the basis of the said missing document. If anyone has already carried out or being carried out kindly inform the undersigned in writing on the below mentioned address within 14 days from this present.

Description of lost misplaced original documents

| Sr. no | Village | Doc No. | Seller | Purchaser |
|---|---|---|---|---|
| 1 | Tadwagale Tal. Alibag, Dist.Raigad, Gat No. 41. | Sale Deed ALB 305/1994 | Prabhakar Vithoba Kadam and Others | Premium Chick Feeds Pvt. Ltd. Through Director Shyam Bhalchandra Dhavan |
| 2 | Tadwagale Tal. Alibag, Dist. Raigad, Gat No.39/1 and 42. | Sale Deed ALB 306/1994 | Sitabai Ramchandra Mandvkar and Others | |
| 3 | Roha Dattaprabha Apt. Gala No. 8 | Agreement for Sale 32/2008 | M/s. Vardhman Builders | Sitaram Athalekar |
| 4 | Shighre, Tal. Murud Dist. Raigad, Gat.No. 171. | Sale Deed MRR 107/1997 | Balaji Gamji Kamare | Shyam Bhalchandra Dhavan |
| 5 | Hingangaon, Tal Faltan, Dist. Satara Gat. No. 628, 639 & 645 | Sale Deed PLT 5484/2009 | Shubhash Chavan | |

Dated :-18/04/2024
Place: - Alibag
Mob. No. 9922707012

**Adv.Swapnil Narendra Mhatre**
Office Address: Rugveda, Flat
No.3, 1st Floor, Shreebag No.3, Alibag. Dist Raigad

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.७७/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ
वय ६४ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. तिलोरे, पो. विघवली,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत साले, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची भाची कै. गौरी महादू मुंढे ही दि. १५/०३/१९९४ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मृत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १५/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची भाची कै . गौरी महादू मुंढे ही दि. १५/०३/१९९४ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची भाची कै. गौरी महादू मुंढे ही दि. १५/०३/१९९४ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता. : १२-०४-२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ४८/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. याकुब दाऊद चिलवान
वय : ७३ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु. पो. मोर्बा, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगाव,
ता. माणगाव, जि. रायगड.

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

सदरहू अर्जदार श्री. याकुब दाऊद चिलवान यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०८/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. याकुब दाऊद चिलवान यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १८/०४/२०२४

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. ७३/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. तिलोरे, पो. विघवली,
ता. माणगाव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत साले, ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची बहिण कै. सरशी सिताराम भोनकर ही दि. १८/०२/१९९७ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मृत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २३/०८/२०२२ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची बहिण कै. सरशी सिताराम भोनकर ही दि. १८/०२/१९९७ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची बहिण कै. सरशी सिताराम भोनकर ही दि. १८/०२/१९९७ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता.: १२/०४/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. ७४/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. तिलोरे, पो. विघवली,
ता. माणगाव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह, नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत साले, ता. माणगाव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव,जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची बहिण कै. लिंबा नथु जाधव ही दि. १७/०१/२०१९ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मृत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०६/०२/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची बहिण कै. लिंबा नथु जाधव ही दि. १७/०१/२०१९ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. कृष्णा अंबाजी ढाकवळ यांची बहिण कै. लिंबा नथु जाधव ही दि. १७/०१/२०१९ रोजी मौजे तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव :
ता. : १२/०४/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

**निवडक**

## कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**खारेपाट :** टाकादेवी स्पोर्टस क्लब व ग्रामस्थ मांडवा यांच्या संयुक्त विद्यामाने, रायगड जिल्हा कबड्डी असो.च्या मान्यतेने अलिबाग रेवस पंचक्रोशी मर्यादित पुरुष कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.२०) मांडवा बंदर येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक १०,००० रु., व्दितीय क्रमांक ७,००० रु., तृतीय व चतुर्थ क्रमांकास ५,००० रू. व भव्य चषक अशी आकर्षक बक्षीसे या ठेवण्यात आलेली आहेत. तसेच, सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ठ पकड, उत्कृष्ट चढाई व पब्लिक हिरो यांना सायकल व चषकदेण्यात येणार आहे.

## धोनीच्या खेळीवर रोहित प्रभावित

**मुंबई :** आयपीएलनंतर टी-२० विश्वचषक खेळायचा आहे. रोहित शर्मा म्हणाला की, धोनी आणि दिनेश कार्तिक या हंगामात ज्या प्रकारे फलंदाजी करत आहेत त्यामुळे मी खूप प्रभावित झालो आहे. धोनीने शेवटच्या सामन्यात फक्त ४ चेंडूत २२ धावा केल्या, त्याने जबरदस्त प्रभाव पाडला. मात्र, धोनीला दुखापत झाल्यामुळे वेस्ट इंडिजमध्ये येण्यासाठी त्याला पटवणे कठीण आहे. तो अमेरिकेत येत असला तरी तो गोल्फ खेळायला येणार आहे. याशिवाय, कार्तिकला वेस्ट इंडिजमध्ये येण्यासाठी पटवणे सोपे जाईल.

## खेळाडूंवर पराभवाचे खापर

**नवी दिल्ली :** गेल्या दोन हंगामात चांगली कामगिरी करणाऱ्या गुजरात टायटन्सची अवस्था यंदाच्या हंगामात बिकट होत चालली आहे. बुधवारी आयपीएलच्या सामन्यात गुजरातला दिल्लीकडून दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. या सामन्यात गुजरात टायटन्सची फलंदाजी खूपच खराब झाली. ८९ धावा करून संपूर्ण संघ ऑलआऊट झाला. यानंतर शुभमन गिलच्या कर्णधारपदावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या लाजिरवाण्या पराभवानंतर गिलने स्वत:शिवाय अन्य दोन खेळाडूंवर पराभवाचं खापर फोडले.

## कोलकाताच्या पराभवाचे कारण

**कोलकाता :** यंदाच्या आयपीएलमध्ये श्रेयस अय्यरकडून निर्धारिक वेळेत २० षटके पूर्ण न केल्याचा प्रकार झाल्यामुळे दंड आकारण्यात आला; परंतु त्यापेक्षा अखेरच्या षटकांत बटलर सामन्यास कलाटणी देणारी खेळी करत असताना श्रेयस सीमारेषेवर चारच खेळाडू उभे करू शकला. आम्हाला सामना जिंकण्याची चांगली संधी होती; पण अंतिम क्षणी काय घडले हे सांगणे कठीण आहे. हा पराभव स्वीकारून आम्हाला पुढे जायला हवे, असे श्रेयसने सामन्यानंतर सांगितले.

## पंत इज बॅक

**नवी दिल्ली :** ऋषभ पंत दुखापतीतून पूर्णपणे सावरला असल्याचे पुरावे गुजरात विरूद्ध सामन्यात मिळाले. १५ महिन्यांनंतर पुनरागमन केल्यानंतर सर्वांनाच त्याच्या फिटनेसची चिंता लागली होती. दिल्लीच्या कर्णधाराने धोनी सारखे लाईटनिंग फास्ट स्टंपिंग करत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. गुजरात आधीच संघर्ष करत असताना, पंतने स्टंपच्या मागे जादू निर्माण केली आणि अभिनव मनोहरला क्षणार्धात तंबूत परत पाठवले. अशाच प्रकारे त्याने डेव्हिड मिलरचा देखील एक अफलातून झेल टिपला.

# क्रिकेटमध्ये घडला इतिहास

### ■ एकटीने चोपल्या नाबाद १९५ धावा

**। केप टाउन । वृत्तसंस्था ।**
**इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये चौकार-षटकारांची आतषबाजी होत असताना रोज नवनवीन विक्रमांची नोंद होत आहे. तसेच वादळ काल दक्षिण आफ्रिकेत घोंगावले. श्रीलंकेच्या महिला संघाची कर्णधार चमारी अटापट्टूने एकदिवसीय क्रिकेटमध्ये वादळी खेळीची नोंद करताना शेन वॉटसन, महेंद्रसिंग धोनी व विराट कोहली या दिग्गजांना मागे टाकले. दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाने विजयासाठी ठेवलेल्या ३०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चमारीने एकटीने नाबाद १९५ धावांची स्फोटक खेळी केली आणि संघाला विजय मिळवून दिला.**

यावेळी आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद ३०१ धावा उभ्या केल्या. कर्णधार लॉरा वोलव्हार्डने १४७ चेंडूंत २३ चौकार व ४ षटकारांच्या मदतीने नाबाद १८४ धावा चोपल्या. लारा गुडॉल (३१), मॅरिझने कॅप (३६) व नॅडीन डे क्रेर्क (३५) यांची तिला साथ मिळाली. पण, आफ्रिकेच्या गोलंदाजांसमोर चमारी उभी राहिली. तिने १३९ चेंडूंत २६ चौकार व ५ षटकारांसह नाबाद १९५ धावा केल्या आणि श्रीलंकेला ६ विकेट्सने विजय मिळवून दिला.

निलाक्षिका सिल्वाने नाबाद पन्नास धावा केल्या. चमारी व निलाक्षिका यांनी १४६ चेंडूंत १७९ धावांची नाबाद भागीदारी केली. महिलांच्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये लक्ष्याचा पाठलाग करताना चमारीने केलेल्या १९५ धावा या सर्वोत्तम ठरल्या. यापूर्वी २०१७ मध्ये मेग लॅनिंगने नाबाद १५२ (वि. श्रीलंका) धावा केल्या होत्या आणि कालपर्यंत लक्ष्याचा पाठलाग करताना दीडशेपार धावा करणारी ती एकमेव महिला खेळाडू होती. महिलांच्या एकदविसीय क्रिकेटमधील ही तिसरी सर्वोत्तम वैयक्तिक खेळी ठरली. एमेलिया केरने २०१८ मध्ये आयर्लंडविरुद्ध नाबाद २३२ धावा केल्या होत्या. त्याआधी १९९७ मध्ये बेलिंडा क्लार्कने डेनमार्कविरुद्ध नाबाद २२९ धावा केलेल्या. चमारीने काल भारताच्या दीप्ती शर्माचा १८८ धावांचा विक्रम मागे टाकला.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये (पुरुष/महिला) धावांचा यशस्वी पाठलाग करतानाची ही दुसरी सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली. ग्लेन मॅक्सवेलने २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध नाबाद २०१ धावा चोपल्या होत्या. चमारीने काल नाबाद १९५ धावा करून शेन वॉटसन (१८५ वि. बांगलादेश, २०११), महेंद्रसिंग धोनी (१८३ वि. श्रीलंका, २००५) आणि विराट कोहली (१८३ वि. पाकिस्तान, २०१२) यांना मागे टाकले.



## कसोटी सामने खेळण्यास तयार

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान हे दोन कट्टर प्रतिस्पर्धी सध्या आयसीसी स्पर्धांमध्येच एकमेकांविरूद्ध शड्डू ठोकतात. भारतीय संघ पाकिस्तानचा दौरा करत नाही अन् पाकिस्तानला भारतात येण्याची परवानगी नाही. त्यामुळे या दोन देशांमध्ये द्विपक्षीय मालिका होत नाहीत. दरम्यान, भारताचा कर्णधार रोहित शर्माने एक मोठं वक्तव्य करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रोहित शर्माने तो पाकिस्तानविरूद्ध कसोटी सामने खेळण्यास तयार असल्याचं सांगितलं आहे. रोहितला इतर कोणत्या गोष्टींची चिंता नाही त्याला फक्त बॅट आणि बॉलमध्ये चांगले द्वंद्व झालेलं पाहायचं आहे. रोहित शर्मा म्हणाला की, पाकिस्तानविरूद्ध कसोटी सामने खेळण्यास मी तयार आहे. आम्ही त्यांच्यासोबत आयसीसी स्पर्धेत खेळत आहोतच.

### इम्पॅक्ट खेळाडू नियमावर नाराजी

## भारतीय संघाला बसतोय फटका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ मध्ये इम्पॅक्ट प्लेयर नियम हा खूप चर्चेचा विषय बनला आहे. या नियमानुसार, सर्व संघांकडे प्रत्येक सामन्यासाठी ५ इम्पॅक्ट प्लेयर असतात. त्यापैकी संघ एका खेळाडूचा वापर करू शकतो. प्रत्येक सामन्यात संघ या नियमानुसार एका खेळाडूचा वापर करतो. सामन्यादरम्यान एखाद्या संघाला फलंदाजाची गरज भासल्यास संघ एखाद्या खेळाडूचा इम्पॅक्ट प्लेयर म्हणून वापर करतो, त्यानंतर अकरामधील खेळाडूला मैदानाबाहेर बसावे लागते.

जर एखाद्या संघाला गोलंदाजाची गरज असेल तर संघ गोलंदाजाचा वापर करतो. आयपीएलमधील सर्व संघ या नियमाचा पुरेपूर फायदा घेत असले तरी या नियमाचा थेट परिणाम अष्टपैलू खेळाडूंवर होताना दिसत आहे. जे भारतासाठी चांगले नाही.

एका माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूने इम्पॅक्ट खेळाडू या नव्या नियमाबद्दल नाराजी व्यक्त केली. तो म्हणाला, इम्पॅक्ट खेळाडू हा नवा नियम आयपीएलमध्ये गाजतोय. क्रिकेटप्रेमींनाही हे आवडत आहे; पण भारतीय क्रिकेट संघाला या नव्या नियमाचा फटका बसतो आहे. नव्या नियमामुळे पूर्णपणे तंदुरुस्त नसलेला हार्दिक पंड्याही गोलंदाजी करीत आहे. इम्पॅक्ट खेळाडू हा नियम नसता, तर चेन्नईकडून शिवम दुबेला सातत्याने गोलंदाजी दिली गेली असती; पण आता नव्या नियमामुळे त्याला गोलंदाजी देण्यात येत नाही. त्यामुळे निवड समितीला शिवम कशा प्रकारे गोलंदाजी करू शकतो, हेच माहीत नाही. राहुल तेवतिया हा खरेतर अष्टपैलू खेळाडू; पण त्याची इम्पॅक्ट खेळाडू म्हणून निवड केली जाते, त्यामुळे फिरकी गोलंदाजासाठी ओळखल्या जाणाऱ्या तेवतिया याला गोलंदाजी करता येत नाही.

## प्ले-ऑफची रंजक शर्यत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्सविरुद्ध एकतर्फी सामना जिंकला आणि पॉइंट टेबलमध्येही मोठी झेप घेतली. तर, गुजरात टायटन्स संघ या सामन्यात पूर्णपणे फ्लॉप ठरला. ना फलंदाज काही अप्रतिम करू शकले ना गोलंदाजांनी आपली छाप सोडली.

दिल्लीच्या विजयामुळे काही संघांना आता प्ले ऑफमधून बाहेर पडण्याचा धोका आहे. या विजयासह दिल्ली कॅपिटल्सने गुणतालिकेत सहाव्या स्थानावर पोहोचले आहे. त्यांचे आता ६ गुण झाले आहेत. दुसरीकडे, गुजरात टायटन्सला या पराभवामुळे नेट रनरेटमध्ये मोठा फटका बसला आहे. गुजरातचे देखील ६ गुण आहेत, परंतु त्यांचा रन रेट -१.३०३ वर पोहोचला आहे. आयपीएलमध्ये, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्सने देखील आतापर्यंत ७ सामन्यांमध्ये ३ विजय नोंदवले आहेत, परंतु नेट रनरेटमुळे दिल्ली गुणतालिकेत गुजरातपेक्षा एक स्थान वर आहे.



## चेन्नई संघात मोठा बदल

**चेन्नई :** आयपीएलचा निम्मा हंगाम जवळपास संपत आला आहे. काही संघांचा हंगाम चांगला चालला आहे, तर काही संघांचा हंगाम खूपच खराब आहे. दरम्यान, ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील चेन्नईला मोठा धक्का बसला आहे. ड्वेन कॉनवे आयपीएलच्या संपूर्ण हंगामातून बाहेर आहे. त्याच्या बदलीची घोषणाही संघाने केली आहे. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लीसनचा संघात समावेश करण्यात आला आहे. गेल्या दोन वर्षांपासून सीएसकेकडून खेळत असलेल्या कॉनवेबद्दलच्या बातम्या आधीच आल्या होत्या की, तो किमान अर्धा हंगाम खेळू शकणार नाही. तो नंतर परतेल अशी अपेक्षा होती, पण आता बातमी आली आहे की तो संपूर्ण हंगामासाठी बाहेर गेला आहे.

## मॅक्सवेलचा दुसऱ्या संघासोबत करार

**। नवी दिल्ली वृत्तसंस्था ।**

आयपीएल हे पर्व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी काही खास गेलेले नाही. सातपैकी १ सामनाच त्यांना जिंकता आला आहे आणि प्ले ऑफमध्ये जागा पटकावची असल्यास त्यांना उर्वरित सातही सामने जिंकावे लागतील व अन्य संघाच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल. त्यात स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेल याला अपयश आले आणि त्याने अनिश्चित काळासाठी आयपीएलमधून माघार घेतल्याचे जाहीर केले. पण, दरम्यान मॅक्सवेलने अमेरिकेत होणाऱ्या मेजर लीग क्रिकेटच्या दुसऱ्या सत्रात खेळणार असल्याची घोषणा केली आहे.



ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धा संपल्यानंतरचा दुसरा हंगाम अमेरिकेत खेळवला जाईल. ग्लेन मॅक्सवेलने मेजर लीग क्रिकेटमध्ये वॉशिंग्टन फ्रीडम संघासोबत करार केला असल्याचे सांगितले. या संघाच्या प्रशिक्षकाची भूमिका रिकी पाँटिंग बजावणार असून स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड यांचाही समावेश आहे.

## सुनिल नारायणने निवृत्ती मागे घ्यावी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**




फलंदाजांना आकलन न होणारी शैली आणि स्वतः शतक करण्याची क्षमता अशी गुणवत्ता असलेल्या सुनील नारायणला आंतरराष्ट्रीय निवृत्ती मागे घेण्यासाठी त्यांचा कर्णधार रोवमन पॉवेल सर्व प्रयत्न करत आहे; पण नारायण काही दाद लागू देत नाही.

आयपीएलमध्ये कोलकता संघाचा सर्वात हुकमी खेळाडू ठरत असलेल्या नारायणने राजस्थानविरुद्धच्या सामन्यात सलामीला खेळताना शतकी खेळी केली. त्यानंतर गोलंदाजीत ४-०-३०-२ अशी कामगिरी केली. कोलकता संघाकडून त्याला यंदाही सलामीला पाठवण्यात येत आहे आणि त्यात तो यशस्वी होत आहे. खरे तर वेस्ट इंडीज संघातून कधीच बाहेर गेलेल्या नारायणने आंतरराष्ट्रीय निवृत्ती स्वीकारली आहे; पण जून महिन्यात वेस्ट इंडीज आणि अमेरिकेत होत असलेल्या ट्वेन्टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी नारायण वेस्ट इंडीज संघात असावा, यासाठी कर्णधार पॉवेल प्रयत्न करत आहे. मंगळवारी कोलकता आणि राजस्थान यांच्यातील सामन्यात नारायण आणि पॉवेल आमनेसामने झाले होते.

नारायणशी संपर्क साधण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत; परंतु त्याने सर्वांना ब्लॉक केले आहे. अशी खंत पॉवेलने उघडपणे बोलून दाखवली.

## गुजरातचा दारूण पराभव

**। नवी दिल्ली । वत्तसंस्था ।**



आयपीएलच्या १७ व्या हंगामातील ३२वा सामना अहमदाबाद येथे पार पडला. या सामन्यात गुजरात आणि दिल्ली आमनेसामने होते. ज्यामध्ये दिल्लीने गुजरातवर ६ विकेट्सनी एकहाती विजय मिळवला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करायला उतरलेला गुजरातचा संघ दिल्लीच्या गोलंदाजांसमोर फलंदाजी करताना हतबल दिसला. ज्यामुळे गुजरातचा संघ १७.३ षटकांत ८९ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात दिल्लीने ८.५ षटकांत ४ बाद ९२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. त्याचबरोबर दिल्लीने चेंडूच्या बाबतीत आयपीएलमधील सर्वात मोठा विजय नोंदवला.


दिल्लीची सुरुवात चांगली झाली. पृथ्वी शॉ आणि जॅक फ्रेझर यांच्यात पहिल्या विकेटसाठी २५ धावांची भागीदारी झाली. स्पेन्सर जॉन्सनने संघाला पहिला धक्का दिला. त्यांनी मॅकगर्कची शिकार केली. त्याला दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २० धावा करता आल्या. तर शॉ केवळ सात धावा करू शकला. या सामन्यात अभिषेकने १५, होपने १९, पंतने १६ आणि सुमितने ९ धावा केल्या. पंत आणि सुमित नाबाद राहिले. गुजरातकडून संदीपने दोन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर जॉन्सन आणि राशिद यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## हार्दिकशिवाय संघर्ष

**नवी दिल्ली :** गुजरातने हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली आयपीएल २०२२ जिंकली. यानंतर गुजरात आयपीएल २०२३ मध्ये उपविजेती ठरली. पण या मोसमात हार्दिक मुंबईचा कर्णधार आहे. वास्तविक, अलीकडेच मुंबईने हार्दिकला गुजरातकडून ट्रेड केले होते. मात्र, या मोसमात आतापर्यंत हार्दिकची कामगिरी मुंबईसाठी निराशाजनक ठरली आहे. यावर आता आकाश चोप्राने प्रतिक्रिया दिली आहे. आकाश चोप्राने आपल्या ट्विटमध्ये लिहिले की, कदाचित आतापर्यंत मुंबईला हार्दिकचा फायदा झाला नसेल, पण गुजरात हार्दिकशिवाय संघर्ष करत आहे.

## ‘या’ वीस खेळाडूंची नावे समोर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



जून महिन्यात वेस्ट इंडीज व अमेरिका येथे टी-२० विश्वकरंडकाचा थरार रंगणार आहे. त्याआधी एक मेपर्यंत संभाव्य संघाची निवड करण्यात यावी, असा आदेश आयसीसीकडून देण्यात आला आहे. तंदुरुस्त असलेल्या आणि गेल्या वर्षभरात भारतीय संघातून खेळलेल्या क्रिकेटपटूंचीच निवड करण्यात येण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, टीम इंडियाच्या २० खेळाडूंची नावे समोर आली आहेत.

गल व यशस्वी या दोघांची अंतिम पंधरा जणांच्या चमूत निवड झाल्यास दुबे व रिंकू या मधल्या फळीतील एकालाच भारताच्या अंतिम १५ जणांच्या संघात निवडण्यात येईल. तसेच, सॅमसन, राहुल, पंत, इशान, जितेश हे खेळाडू यष्टिरक्षणासाठी शर्यतीत आहेत. हार्दिककडून प्रतिमेला साजेशा खेळ आयपीएलमध्ये होत नाही; त्याला बाहेरचा रस्ता दाखवण्यात येईल, अशी चिन्हे नाहीत. कोहलीचेही स्थान पक्के सम जले जात आहे. रोहित, सूर्यकुमार या फलंदाजांचाही समावेश पक्का आहे. जडेजा, अक्षर या अष्टपैलू खेळाडूंना प्राधान्य देण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. फिरकी गोलंदाजीचा विचार करता कुलदीप व चहल या फिरकीपटूंना टी-२० विश्वकरंडकाचे तिकीट बुक करता येणार आहे. बिश्नोई याचे दोघांनाही आव्हान असेल; पण जडेजा व अक्षर या अष्टपैलू खेळाडूंना संधी दिल्यास कुलदीप व युझवेंद्र यांच्यापैकी एकालाच संधी मिळू शकते. वेगवान गोलंदाजीत बमराचे स्थान निश्चित आहे. मोहम्मद सिराज, आवेश खान, अर्शदीप सिंग यांना संधी आहे.

### पीएसजीची उपांत्य फेरीत धडक

## बार्सिलोनावर मात

**। बार्सिलोना । वृत्तसंस्था ।**
**कायलियन एम्बापेने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर पीएसजीने बार्सिलोनाचा ४-१ असा पराभव केला आणि पहिल्या टप्प्यातील पिछाडी मागे टाकून चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली.**

पॅरिसमध्ये झालेल्या पहिल्या टप्प्यातील लढतील पीएसजीला २-३ अशा पराभवाचा सामना करावा लागला होता. आता बार्सिलोनात झालेल्या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी ४-१ असा विजय मिळवला आणि २०२१ नंतर प्रथमच चॅम्पियन्स लीगमध्ये उपांत्य फेरी गाठली. उपांत्य सामन्यात पीएसजीचा सामना बोर्सिया ड्रॉटमंड संघाविरुद्ध होईल. ड्रॉटमंड संघाने ॲटलेटिको माद्रिदवर ५-४ (सरासरी) अशी मात केली.

बार्सिलोनाविरुद्धच्या या सामन्यात पीएसजीने आक्रमक सुरुवात करून वर्चस्व मिळवले होते; परंतु पहिला गोल करण्याचा मान बार्सिलोनाला मिळाला. लामिने यामल याने उजव्या बगलेतून आक्रमण केले आणि नुनो मेंडेसकडे चेंडू दिला. त्यानंतर त्याने दिलेल्या पासवर राफिन्हाने शानदार गोल केला. १२ व्या मिनिटालाच हा गोल स्वीकारल्यामुळे पीएसजी समोरचे आव्हान वाढले होते. कारण सरासरीत बरोबरी साधण्यासाठी त्यांना दोन गोलांची गरज होती.



तसेच, हा सामना बार्सिलोनाच्या होम ग्राऊंडवर होत असल्यामुळे प्रेक्षक बार्सिलोनाच्या बाजूने होते. अशा अटीतटीच्या क्षणी बार्सिलोनाचा डिफेंडर रोनाल्ड अरायो रेड कार्ड मिळाले. त्यामुळे बार्सिलोनावर पुढील ६० मिनिटांच्या खेळात १० खेळाडूंसह खेळण्याची वेळ आली. या संधीचा फायदा ऑसमाने देम्बेले याने घेतला आणि सहा यार्डावरून चेंडू गोलजाळ्यात मारला. त्यानंतर हाकिमीच्या पासवर वितिन्हा याने गोल केला. पीएसजीने २-१ अशी आघाडी घेतली. त्यापेक्षा सरासरीत ४-४ अशी बरोबरी साधली.

या गोलामुळे आत्मविश्वास वाढलेल्या आणि उपांत्य फेरी गाठण्याची संधी निर्माण झालेल्या पीएसजीच्या खेळाची धार अधिकच वाढली. एम्बापेने सूत्रे घेतली आणि ६१ व्या मिनिटाला मैदाना गोल केल्यावर ८९ व्या मिनिटाला पेनल्टी कीक सत्कारणी लावली.

## भारत अंतिम फेरीत दाखल

**। कोलंबो । क्रीडा प्रतिनिधी ।**




जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाच्यामान्यतेने सिलोन इनडोअर क्रिकेट असोशिएशन यांच्या पुढाकाराने इंग्लंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धेत भारताने साखळीतील शेवटचे दोन्ही सामने जिंकत अंतिम फेरी गाठली. इंग्लंडने साखळीत केलेल्या पहिल्या पराभवाची सव्याज परतफेड करताना अंतिम फेरीत रुबाबात प्रवेश केला. गुणतालिकेत श्रीलंका प्रथम स्थानावर असून पाठोपाठ भारत सुध्दा दुसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंड व सिंगापूर अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या स्थानावर असून अंतिम सामन्यातून बाहेर फेकले गेले आहेत.

भारतीय संघाने इंग्लंडच्या पहिल्या पराभवाची सव्याज पराभवाची परतफेड करत स्पर्धेत पुन्हा एकदा जोरदार मुसंडी मारत अंतिम फेरीत स्थान मिळवले. भारतीय संघ गुणी असून अंतिम फेरीत भारत चमकदार कामगिरीची नोंद करेल असे प्रशिक्षक जयेश साळगावकर यांनी स्पष्ट केले.

भारताने प्रथम फलंदाजी करताना १६ षटकात १०२ धावा करताना सामन्यावर सुरवातीपासूनच वर्चस्व राखले होते. या सामन्यात भारताच्या विजय गौडाने (१६ धावा, १ बळी), धनुष भास्कर (१९धावा १ बळी), आफ्रोज पाषा (१९ धावा व २ बळी), कार्थिक सुब्रमनियन (१८ धाव) व दैविक राय १ बळी) यांनी जोरदार कामगिरी करताना इंग्लंडला पराभवाची धूळ चारली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)